# महाराष्ट्र विधानपरिषद

## चौथे अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ / अग्रहायण २०, १९३९ (शके)**

**(१) वित्त व नियोजन, वने मंत्री**
**(२) ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री**
**(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**
**(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
**(५) जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री**
**(६) रोजगार हमी, पर्यटन मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८४**

---

## राज्य शासनातील अधिकारी व कर्मचारी यांना बालसंगोपन आणि अन्य कारणांसाठी विविध सुविधा देण्याबाबत

**(१) * ३५०१४ श्री.कपिल पाटील, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३२२७२ ला दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सेवेतील व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला कर्मचारी व अधिकारी तसेच अनुदानित शाळा, महाविद्यालयातील महिला शिक्षक व शिक्षकेतर यांना बालसंगोपनासाठी केंद्राप्रमाणे भरपगारी रजा, लहानग्यांच्या स्तनपानासाठी व्यवस्था आणि पुरुष कर्मचाऱ्यांना पॅटर्निटी लिव्ह देण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, सदर कार्यवाही कधीपर्यंत पूर्ण होईल,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) ते (३) राज्य शासनाच्या सेवेतील व स्थानिक स्वराज्य संस्थामधील महिला कर्मचारी व अधिकारी तसेच अनुदानित शाळा, महाविद्यालयातील महिला शिक्षक व शिक्षकेतर यांना बाल संगोपनासाठी बाल संगोपन रजा तसेच संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पॅटर्निटी लिव्ह देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

राज्य शासनाच्या सेवेतील व स्थानिक स्वराज्य संस्थामधील महिला कर्मचारी व अधिकारी तसेच अनुदानित शाळा, महाविद्यालयातील महिला शिक्षक व शिक्षकेतर यांना लहानग्यांच्या स्तनपान व्यवस्थेसाठी नविन बांधकामाची मागणी आल्यास सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हयात आमदार स्थानिक विकास कार्यक्रमातील निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(२) * ३४९१३ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हयात सन २०११ पासून आमदार स्थानिक विकास कार्यक्रमातील कोट्यवधी रुपयांचा निधी अखर्चित राहिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून जिल्हा नियोजन अधिकारी, बीड यांना दिनांक १७ एप्रिल, २०१७ रोजी स्मरणपत्राद्वारे संबधित प्रपत्रात माहिती मागवूनही सदर माहिती विहित मुदतीत उपलब्ध होत नसल्याने हा निधी खर्च करण्यास शासन परवानगी देत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधी यांनी मागणी करुनही उक्त निधी खर्चाबाबतचे मासिक अहवाल तसेच इतर आवश्यक माहिती उपलब्ध करून दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच मा.वित्त व नियोजन मंत्री यांना उक्त प्रकरणी अखर्चित निधी खर्च करण्यास परवानगी देण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजी केलेल्या विनंतीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) होय, बीड जिल्हयात आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन २०११-१२ ते २०१५-१६ या कालावधीतील रुपये १.८९ कोटी एवढा अखर्चित निधी आहे.

(३) मा.लोकप्रतिनिधी यांनी आमदार स्थानिक विकास कार्यक्रम संदर्भात खर्चाची माहिती मागितल्यास जिल्हा नियोजन समितीतर्फे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत तात्काळ उपलब्ध करुन दिली जाते.

(४) व (५) मा.लोकप्रतिनिधींच्या विनंतीच्या अनुषंगाने आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत जिल्हयातील सर्वच अखर्चित निधीबाबतचा आढावा घेऊन एकत्रित प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, बीड यांना दिनांक १७/०४/२०१७ रोजी देण्यात आल्या होत्या. तथापि रुपये १.८९ कोटी एवढा अखर्चित निधी खर्च करण्यासाठी अनुमती देण्याबाबतचा प्रस्ताव बीड जिल्हयाकडून प्राप्त झालेला नाही. वित्त विभागाच्या दिनांक २१/९/२०१७ च्या शासन निर्णयान्वये सर्व जिल्हयांसाठी दिनांक ३१ मार्च, २०१६ अखेर अखर्चित असलेला निधी खर्च करण्याची व शासनखाती जमा करण्याची कार्यप्रणाली निश्चित केली असून त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत दिनांक २६/०९/२०१७ रोजी सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे.

-----------------

## पालघर जिल्हयातील कुपोषणाबाबत

**(३) * ३५६०० श्री.जयंत पाटील, श्री.रविंद्र फाटक, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.आनंद ठाकूर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील मोखाडा एकत्मिक बाल विकास प्रकल्पांतर्गत १७८ मुळ अंगणवाडया व ५१ मिनी अंगणवाडया असून त्यातील एकात्मिक बालविकास प्रकल्पाच्या आकडेवारीनुसार २९४ बालके कुपोषित असून कुपोषित बालकांपैकी ४४ बालके अति तीव्र कुपोषित असून मृत्यू होण्याच्या अवस्थेत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पालघर जिल्हयात सन २०१६-१७ या वर्षात कुपोषणाने ६०० बालमृत्यू झाले आहेत तर माहे जानेवारी, २०१७ ते ऑगस्ट, २०१७ या कालावधीत डहाणू, पालघर, विक्रमगड, मोखाडा, तलासरी, वाडा, वसई या तालुक्यात ० ते ६ वयोगटातील ३१३ बालकांचा मृत्यू झालेला असून त्याचबरोबर रायगड जिल्हयात २०१६-१७ या वर्षभरात ४६५ बालमृत्यू व मातामृत्यू झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवजात बालकांना जंतुसंसर्ग, फुप्फुस संसर्ग, कावीळ, प्रसूतीदरम्यान झालेल्या श्वसनरोध यासारख्या व विविध कारणांमुळे कमी वजनाचे बालक जन्माला येणे, पूर्ण वाढ न झालेले बालक जन्माला येणे, ही बालमृत्यू मागची कारणे असून विविध उपाययोजना राबवूनही तसेच प्रत्येक महिन्यात कुपोषणामुळे बालकांचा मृत्यू होत आहे तसेच उपाययोजनांवर निधीचा खर्च कमी केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यातच मानधन वाढीसाठी अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी केलेल्या संपामुळे संपकाळात येथील १८ कुपोषित बालकांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मोखाडा तालुका कुपोषणाच्या बाबतीत संवेदनशील असतांनाही येथील ग्रामीण रुग्णालयात स्त्रीरोग व बालरोग तज्ञांची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बालमृत्यू व मातामृत्यू रोखण्याबाबत तसेच मोखाडा ग्रामीण रुग्णालयात स्त्रीरोग व बालरोग तज्ञांच्या रिक्त पदांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे. पालघर जिल्हयातील मोखाडा प्रकल्पात १७८ मुळ अंगणवाडया व ५१ मिनी अंगणवाडया आहेत. जिल्हयाच्या माहे सप्टेंबर, २०१७ च्या प्रगती अहवालानुसार २४८ बालके-तीव्र कुपोषित (MAM) व ४४ बालके अती तीव्र कुपोषित (SAM) मध्ये असे एकुण २९२ बालके कुपोषित होती.

(२) नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अभिलेखानुसार सन २०१६-१७ या वर्षात पालघर जिल्हयात एकुण ५५७ बालमृत्यू विविध कारणांमुळे झाले आहेत. तसेच पालघर जिल्हयामध्ये माहे जानेवारी, २०१७ ते ऑगस्ट, २०१७ या कालावधीत एकुण ३१३ बालमृत्यू झाले आहेत. मात्र सदर बालमृत्यू हे कुपोषणामुळे झालेले नसून वेगवेगळया कारणांनी झालेले आहेत. वर नमूद केलेले बालमृत्यू हे साधारणत: कारणे पुढील प्रमाणे आहेत - कमी वजनाची बालके जन्माला येणे, न्युमोनिया, डायरिया, श्वसनाचे आजार, मुदतपुर्व प्रसुती इत्यादी.

रायगड जिल्हयात माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान कुपोषित बालकांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झालेली नसून बालकांचे कुपोषणामुळे मृत्यू झालेले नाहीत. तर ० ते ५ वर्ष वयोगटातील ३१६ बालकांचा मृत्यू विविध कारणांमुळे झालेला आहे. वर नमूद केलेले बालमृत्यू हे साधारणत: कारणे पुढील प्रमाणे आहेत - कमी वजनाची बालके जन्माला येणे, न्युमोनिया, डायरिया, उपजत मृत्यू, मुदतपुर्व प्रसुती इत्यादी.

(३) नाही.

कुपोषणामुळे बालमृत्यू झाले नसून विविध कारणांमुळे झालेले आहेत. तसेच बालमृत्यू व कुपोषण रोखण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग व महिला व बाल विभाग यांच्याकडून करण्यात येणाऱ्या सर्व उपाययोयजनांवर निधी पुर्ण खर्च केला आहे.

(४) नाही.

पालघर जिल्हयामध्ये अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या दिनांक ११ ते २४ सप्टेंबर संपाच्या कालावधीत एकुण १५ बालमृत्यू झाले असून सदर बालमृत्यू हे संपामुळे व कुपोषणामुळे झालेले नसून ती कमी वजनाची बालके जन्माला येणे, पुर्ण वाढ न झालेली बालके जन्माला येणे इत्यादी वेगवेगळया कारणांनी झालेले आहेत.

(५) हे अंशत: खरे आहे.

आरोग्य विभागाकडील माहितीनुसार मोखाडा तालुक्यामध्ये स्त्री रोग तज्ञ व विशेषज्ञाचे पद भरण्यात आले असुन बालरोग तज्ञ पद हे रिक्त आहे.

(६) बालरोग तज्ञ पद भरण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## पार-तापी-नर्मदा नदी जोड प्रकल्पाऐवजी नार-गिरणा व पार-गोदावरी हे नदी जोड प्रकल्प राबविण्याबाबत

**(४) * ३५०४२ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक २७४१३ ला दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पार-तापी-नर्मदा नदी जोड प्रकल्पाऐवजी नार-गिरणा व पार-गोदावरी हे नदी जोड प्रकल्प राबविण्याची नाशिक जिल्हयातील लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पार-तापी-नर्मदा या नदी जोड प्रकल्पास राज्याची असहमती कळवावी अशीही नाशिक जिल्हयातील लोकप्रतिनिधींनी माहे आक्टोंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दमणगंगा व नार पार या पश्चिम वाहीनी नद्यांमधील वाया जाणारे पाणी गिरणा व गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी प्रस्तावित असलेल्या २९ वळण योजना एक वर्षात पूर्ण करण्याचे मा.उच्च न्यायालयाने दिनांक २३ नोव्हेंबर, २०१६ रोजी निर्देश देवूनही माहे आक्टोंबर, २०१७ पर्यंत १४ योजनांची कामे पूर्ण झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) व (२) होय.

(३) अंशत: खरे आहे.

पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणाऱ्या एकुण २३ प्रवाही वळण योजनांची कामांची अंमलबजावणी १ वर्षात करण्याचे मा.उच्च न्यायालयाने दिनांक २३/११/२०१६ रोजी निर्देश दिले आहेत. यापैकी ११ वळण योजनांची कामे भौतिकदृष्टया पूर्ण झाली आहेत.

(४) एकूण २३ प्रवाही वळण योजनांपैकी उर्ध्व गोदावरी प्रकल्पामध्ये १२ प्रवाही वळण योजनांचा समावेश असून उर्ध्व गोदावरी प्रकल्पास शासन निर्णय उगोप्र/सुप्रमा/१२१२/प्र.क्र.७९३/११/मोप्र१, दिनांक १०/११/२०१७ नुसार रू. ९१७.१४ कोटी रकमेस तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

एकूण २३ प्रवाही वळण योजनांपैकी ११ प्रवाही वळण योजनांची कामे भौतिकदृष्टया पूर्ण झाली आहेत व ६ प्रवाही वळण योजनांची कामे प्रगतीत आहेत.

३ प्रवाही वळण योजनांना (अंबोली वेळुंजे, कळमुस्ते व कापवाडी) शासनाची तत्वत: मान्यता मिळणेसाठी कार्यवाही प्रगतीत आहे.

२ प्रवाही वळण योजनांना (अंबड व चिमणपाडा) स्वतंत्रपणे प्रशासकीय मान्यता प्राप्त करून घेण्यासाठी आवश्यक प्रस्ताव क्षेत्रियस्तरावर प्रगतीत आहे.

१ प्रवाही वळण योजनाचे काम (पायरपाडा) भूसंपादनास झालेल्या विरोधामुळे अद्याप सूरू करता आले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आकडेवाडीनुसार दरवर्षी १४ हजाराहून अधिक बालकांचा मृत्यू होत असल्याबाबत**

**(५) * ३५१०७ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दरवर्षी १४ हजाराहून अधिक बालकांचा त्यातही नवजात अर्भकांचा मृत्यू होत असल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मोठया प्रमाणात बालमृत्यू होण्याची कारणे काय आहेत, याबाबतची जिल्हानिहाय वस्तुस्थिती आणि आकडेवारीचा तपशील काय आहे, तसेच शहरी आणि आदिवासी विभागातील कुपोषण, आरोग्य सुविधा, उपचारांचा अभाव यामुळे झालेल्या बालमृत्यूबाबत शासनाने अभ्यास केला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी तसेच शासकीय रुग्णालयात अतिदक्षता विभागाची क्षमता वाढविणे व तेथे आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत, बालमृत्यू रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

राज्यात सन २०१४-२०१५, २०१५-२०१६, २०१६-२०१७ व २०१७-२०१८ माहे सप्टेंबर अखेर HMIS च्या अहवालानुसार अनुक्रमे २६१५६, २१९८५, २०२५७, ९२६० बालमृत्यू झालेले आहेत.

(२) बाल मृत्यू होण्याची प्रमुख कारणे कमी दिवसाची प्रसूती, जन्मता कमी वजन, जन्मता श्वसावरोध, श्वसनाचा आजार (ARDS), जंतुसंसर्ग, न्यूमोनिया इत्यादी आहेत.

राज्यात सन २०१४-२०१५, २०१५-२०१६, २०१६-२०१७ व २०१७-२०१८ माहे सप्टेंबर अखरे HMIS च्या अहवालानुसार अनुक्रमे २६१५६, २१९८५, २०२५७, ९२६० बालमृत्यू झालेले आहेत ते पुढीलप्रमाणे-

**District wise Infant & Child Death 2014-15 to 2017-18 up to sep (As per MIS Report)**

| Sr. No. | District | Year 2014-15 | | | Year 2015-16 | | | Year 2016-17 | | | Year 2017-18 up to Sept 17 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Infant Death ( 0 to 1) | Child Death (1 to 5) | Total Deaths (Infant + Child) ( 0 to 5) | Infant Death ( 0 to 1) | Child Death (1 to 5) | Total Deaths (Infant + Child) ( 0 to 5) | Infant Death ( 0 to 1) | Child Death (1 to 5) | Total Deaths (Infant + Child) ( 0 to 5) | Infant Death ( 0 to 1) | Child Death (1 to 5) | Total Deaths (Infant + Child) ( 0 to 5) |
| 1 | Thane | 968 | 165 | 1133 | 862 | 172 | 1034 | 790 | 135 | 925 | 381 | 65 | 446 |
| 2 | Palghar | 470 | 176 | 646 | 479 | 173 | 652 | 519 | 144 | 663 | 225 | 73 | 298 |
| 3 | Raigad | 376 | 73 | 449 | 401 | 53 | 454 | 397 | 79 | 476 | 148 | 17 | 165 |
| 4 | Nashik | 1085 | 291 | 1376 | 991 | 273 | 1264 | 898 | 285 | 1183 | 541 | 140 | 681 |
| 5 | Dhule | 655 | 151 | 806 | 614 | 102 | 716 | 511 | 118 | 629 | 116 | 33 | 149 |
| 6 | Nandurbar | 652 | 284 | 936 | 437 | 113 | 550 | 667 | 157 | 824 | 346 | 65 | 411 |
| 7 | Jalgaon | 847 | 179 | 1026 | 936 | 177 | 1113 | 847 | 127 | 974 | 273 | 48 | 321 |
| 8 | Ahmadnagar | 841 | 224 | 1065 | 849 | 200 | 1049 | 726 | 191 | 917 | 275 | 64 | 339 |
| 9 | Pune | 1891 | 384 | 2275 | 1129 | 855 | 1984 | 591 | 90 | 681 | 363 | 91 | 454 |
| 10 | Solapur | 749 | 143 | 892 | 649 | 193 | 842 | 779 | 97 | 876 | 514 | 74 | 588 |
| 11 | Satara | 557 | 118 | 675 | 430 | 106 | 536 | 355 | 71 | 426 | 153 | 22 | 175 |
| 12 | Kolhapur | 902 | 129 | 1031 | 649 | 129 | 778 | 484 | 80 | 564 | 177 | 29 | 206 |
| 13 | Sangli | 753 | 112 | 865 | 651 | 99 | 750 | 653 | 85 | 738 | 238 | 39 | 277 |
| 14 | Sindhudurg | 69 | 18 | 87 | 73 | 12 | 85 | 31 | 24 | 55 | 20 | 8 | 28 |
| 15 | Ratnagiri | 176 | 30 | 206 | 221 | 33 | 254 | 171 | 30 | 201 | 64 | 14 | 78 |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 16 | Aurangabad | 463 | 168 | 631 | 459 | 88 | 547 | 282 | 85 | 367 | 162 | 25 | 187 |
| 17 | JALNA | 358 | 58 | 416 | 191 | 23 | 214 | 167 | 19 | 186 | 43 | 4 | 47 |
| 18 | Parbhani | 318 | 70 | 388 | 167 | 43 | 210 | 141 | 43 | 184 | 134 | 19 | 153 |
| 19 | Hingoli | 237 | 47 | 284 | 241 | 48 | 289 | 211 | 27 | 238 | 96 | 7 | 103 |
| 20 | LATUR | 178 | 48 | 226 | 193 | 34 | 227 | 174 | 49 | 223 | 53 | 15 | 68 |
| 21 | Osmanabad | 252 | 50 | 302 | 257 | 37 | 294 | 228 | 41 | 269 | 104 | 24 | 128 |
| 22 | Beed | 395 | 154 | 549 | 434 | 119 | 553 | 500 | 88 | 588 | 192 | 49 | 241 |
| 23 | Nanded | 236 | 100 | 336 | 203 | 86 | 289 | 874 | 148 | 1022 | 208 | 28 | 236 |
| 24 | Akola | 947 | 84 | 1031 | 811 | 41 | 852 | 1116 | 46 | 1162 | 475 | 24 | 499 |
| 25 | Washim | 290 | 42 | 332 | 162 | 37 | 199 | 136 | 22 | 158 | 81 | 12 | 93 |
| 26 | Amravati | 819 | 161 | 980 | 533 | 142 | 675 | 615 | 138 | 753 | 294 | 51 | 345 |
| 27 | Yeotmal | 671 | 78 | 749 | 389 | 82 | 471 | 379 | 100 | 479 | 123 | 29 | 152 |
| 28 | Buldhana | 540 | 105 | 645 | 440 | 61 | 501 | 437 | 38 | 475 | 179 | 31 | 210 |
| 29 | Nagpur | 441 | 104 | 545 | 510 | 105 | 615 | 254 | 59 | 313 | 128 | 38 | 166 |
| 30 | Wardha | 249 | 38 | 287 | 172 | 34 | 206 | 209 | 43 | 252 | 68 | 12 | 80 |
| 31 | Bhandara | 355 | 60 | 415 | 404 | 57 | 461 | 325 | 55 | 380 | 164 | 19 | 183 |
| 32 | Gondia | 453 | 53 | 506 | 293 | 49 | 342 | 310 | 57 | 367 | 186 | 23 | 209 |
| 33 | Chandrapur | 526 | 111 | 637 | 565 | 92 | 657 | 608 | 84 | 692 | 289 | 46 | 335 |
| 34 | Gadchiroli | 635 | 120 | 755 | 646 | 127 | 773 | 505 | 97 | 602 | 297 | 38 | 335 |
| 35 | BMC | 2674 | 0 | 2674 | 1503 | 46 | 1549 | 1327 | 88 | 1415 | 785 | 89 | 874 |
| State Total | | 22028 | 4128 | 26156 | 17944 | 4041 | 21985 | 17217 | 3040 | 20257 | 7895 | 1365 | 9260 |

(३) राज्यातील सर्व एसएनसीयुमध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पायाभूत सुविधा, औषधी व उपकरणे उपलब्ध करण्यात आली आहेत. तथापी राज्यातील सर्व एसएनसीयुतील दाखल संख्या, बेड वापर रेट यांचा विचार करुन १३ व्या वित्त आयोगाच्या निधीतून जास्त रुग्ण भरती असणाऱ्या विशेष नवजात काळजी कक्षामध्ये अतिरिक्त खाटांची व्यवस्था, आवश्यक उपकरणांची उपलब्धता तसेच यासाठी लागणाऱ्या अतिरिक्त जागेसाठी १२ ठिकाणी वाढीव बांधकाम करण्यात येत आहे. राज्यात १३ ठिकाणी (३ वैद्यकिय महाविद्यालय, १ ग्रामीण रुग्णालय व ९ उपजिल्हा रुग्णालये) नवीन SNCU स्थापन करण्यात येत आहे. या व्यतिरिक्त वाढलेल्या खांटासाठी अतिरिक्त मनुष्यबळासाठी केंद्र शासनाकडे Supplementary PIP मध्ये मागणी करण्यात येत आहे.

शासनाकडून बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी आरोग्य विभागामार्फत पुढील उपाययोजना करण्यात येतात-संस्थात्मक प्रसूती, नियमित लसीकरण, नवजात काळजी कक्ष, नवजात स्थिरीकरण कक्ष, विशेष नवजात काळजी कक्ष, एचबीएनसी व इन्टेनसिफाईड एचबीएनसी, जीवनसत्व 'अ' व जंतनाशक मोहिम, बाल उपचार केंद्र, पोषण पुनर्वसन केंद्र, मानव विकास कार्यक्रमांतर्गत तज्ञांमार्फत मातांची व बालकांची तपासणी व उपचार, नवसंजीवनी कार्यक्रमांतर्गत मातृत्व अनुदान योजना, भरारी पथकांमार्फत आरोग्य तपासणी व उपचार, दायी बैठक योजना इ.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडी सेविकांच्या मानधनात वाढ व इतर मागण्यांबाबत

**(६) * ३५९८४ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हेमंत टकले, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सुभाष झांबड, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.रविंद्र फाटक, श्री.ख्वाजा बेग, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रविण दरेकर** : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अंगणवाडी सेविकांनी मानधनवाढीसाठी दिनांक ११ सप्टेंबर, २०१७ पासून पुकारलेल्या बेमुदत संपामुळे अंगणवाडीतील पोषण आहारावर अवलंबून असलेल्या ७३ लाख कुपोषित बालकांना पोषण आहार मिळाला नसून त्यांच्या आरोग्याचा तसेच ३ लाख गर्भवती महिलांच्या आरोग्याची गंभीर समस्या निर्माण झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाडी सेविकांच्या संपकाळात पोषण आहार मिळाला नसल्याने १२५ बालकांचा मृत्यू झाला असून अडीच हजार कुपोषित बालके आरोग्य विभागाच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मागण्या काय आहेत, त्यांना दरमहा किती मानधन व इतर सुविधा शासनाकडून दिल्या जातात तसेच आतापर्यंत मानधनात किती वेळा व प्रत्येकी किती वाढ केली आहे, अंगणवाडी सेविकांना मानधन वाढ किती कालावधीत देण्यात येणार आहे,
(४) असल्यास, अंगणवाडी सेविकांच्या मागण्या व मानधन वाढीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) सहा महिने ते सहा वर्षे वयोगटातील बालके, गर्भवती व स्तनदा माता यांना एक महिना पुरेल एवढया कालावधीचा घरपोच आहार Take Home Ration (THR) संप सुरु होण्यापुर्वीच देण्यात आलेला होता. तसेच बहुतांशी अंगणवाडी केंद्रात आशा वर्कर्स, स्थानिक महिला बचत गट, स्थानिक शाळेतील कर्मचारी, ग्रामपंचायत इत्यादी मार्फत अंगणवाडी केंद्रातील ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार वाटप करण्याची पर्यायी व्यवस्था संप कालावधीत करण्यात आली होती. त्यामुळे कुपोषित बालकांना पोषण आहार न मिळाल्यामुळे कोणतीही गंभीर समस्या निर्माण झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२) हे खरे नाही.

पोषण आहार न मिळाल्याने सदरचे बालमृत्यू झालेले आहेत, ही बाब कोठेही आढळून आली नाही. राज्याच्या आरोग्य विभागामार्फत प्राथमिक आरोग्य केंद्रात पोषण व पुनर्वसन केंद्र Nutrition and Rehab Center (NRC) स्थापन करण्यात आले असून या केंद्रात नियमितपणे तीव्र कुपोषित बालकांवर नियमित उपचार सुरु असतात.
(३), (४) व (५) अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या खालीलप्रमाणे मागण्या केल्या आहेत.

१. अंगणवाडी सेविका, मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविका यांना सन्माननीय जीवन जगण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा, वेतनश्रेणी व अन्य लाभ देण्यात यावेत.

२. अंगणवाडी कर्मचारी २००५ पासून सेवानिवृत्त झाले आहेत त्यांना एकरकमीचा लाभ देण्यात यावा.

३. मिनी अंगणवाडीला पुर्ण अंगणवाडीचा दर्जा द्यावा. दरम्यानच्या काळात मिनी अंगणवाडी सेविकाला समान कामाला समान वेतनाच्या सहायाने सेविकेसारखेच मानधन व इतर सर्व लाभ देण्यात यावे.

४. अंगणवाडीच्या कामासाठी लागणारे सर्व रजिस्टर व अहवाल व इतर सर्व साहित्य शासनाने पुरवावे. जे साहित्य हाताने उचलून नेण्यासारखे नाही. असा सर्व खर्च शासनाने द्यावा, इत्यादी मागण्या.

महिला व बाल विकास विभागाच्या दिनांक ३० एप्रिल, २०१४ च्या शासन निर्णयानुसार अंगणवाडी सेविकांना दरमहा रुपये ५०००/-, अंगणवाडी मदतनीसांना रुपये २५००/- व मिनी अंगणवाडी सेविकांना रुपये ३२५०/- प्रमाणे मानधन नियमितपणे देण्यात येते.

१. त्यांना दरवर्षी रुपये १०००/- प्रमाणे भाऊबीज भेट देण्यात येते.
२. गणवेषासाठी प्रतिवर्षी रुपये ४२५/- प्रमाणे रक्कम अदा करण्यात येते.
३. प्रकल्प क्षेत्रात नियमितपणे होणाऱ्या बैठका, इतर कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्यासाठी प्रवासखर्च देण्यात येतो.
४. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना दिनांक १/१०/२०१७ पासून खालीलप्रमाणे मानधनवाढ करणेबाबतची बाब विचाराधीन आहे.

अंगणवाडी सेविका ५०००/- + १५००/- = ६५००/-
अंगणवाडी मदतनीस २५००/- + १०००/- = ३५००/-
मिनी अंगणवाडी सेविका ३२५०/- + १२५०/- = ४५००/-

त्याचप्रमाणे भाऊबीज भेट रुपये १०००/- वरुन रुपये २०००/- करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच दिनांक ०१/०४/२०१८ पासून एकदाच ५% वेतनवाढ देण्यात येणार आहे.

-----------------

## राज्यात हिरकणी कक्षाची स्थापना करण्याबाबत

**(७) * ३४९४९ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय, निम-शासकीय कार्यालये, मॉल, मल्टीप्लेक्स, सार्वजनिक उद्याने, बस-स्थानके याठिकाणी तान्हया बाळांसह येणाऱ्या स्तनदा मातांना, बाळाला स्तनपान करण्यात अडचणी येऊ नयेत याकरिता

स्तनदा मातांच्या सन्मानार्थ राज्यात हिरकणी कक्षाची स्थापना करण्याबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री व मा.महिला व बालविकास मंत्री यांना दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) मंत्रालयीन स्तरावर तसेच प्रशासकीय विभागाच्या अंतर्गत असलेल्या विविध क्षेत्रिय कार्यालयांनी त्यांच्या कार्यालयातील अस्तित्वातील जागेमध्येच महिला कर्मचाऱ्यांची संख्या विचारात घेऊन, जागेच्या उपलब्धतेनुसार विशेष कक्षांची व्यवस्था संबंधित कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग/ स्थानिक सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या मदतीने करावयाची आहे. त्यानुसार सर्व शासकीय विभागांना सूचना देण्याकरीता आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सेनगांव (जि.हिंगोली) येथील ग्रामीण रुग्णालयाचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(८) * ३५११८ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगांव (जि.हिंगोली) येथील ग्रामीण रुग्णालयाचे काम मागील ८ वर्षापासून अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या रुग्णालयाचे काम अपूर्ण असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रुग्णालयालाचे काम पूर्ण करण्याबाबत व निधी उपलब्ध होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) व (३) ग्रामीण रुग्णालय सेनगांव, जि. हिंगोली येथील इमारतीमध्ये काही त्रुटी व बांधकाम अपुर्ण असल्याचे आढळून आले आहे. वैद्यकीय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय, सेनगांव यांचा त्रुटीची पूर्तता करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा सुरु आहे. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदरील काम अद्यापपर्यंत पूर्ण करण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात स्त्री भ्रुण हत्येला आळा घालण्यासाठी ॲक्टीव्ह ट्रॅकरचा वापर करण्याबाबत

**(९) * ३४८०९ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुलींचा घटता जन्मदर, गर्भलिंग निदान चाचणी व स्त्री भ्रुण हत्येला आळा घालण्यासाठी मध्यप्रदेशमधील इंदूर येथील ॲक्टीव्ह ट्रॅकरचा झालेला यशस्वी प्रयोग महाराष्ट्र राज्यात राबविण्याबाबत राज्य महिला आयोगाने शासनाकडे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ॲक्टीव्ह ट्रॅकरमुळे सर्व सोनोग्राफी सेंटरवर झालेल्या चाचण्याचा तपशील शासनाला मिळणार असल्याने सदरील यंत्रणा राज्यातील सर्व सोनोग्राफी सेंटरवर बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) ॲक्टीव्ह ट्रॅकरबाबत अभ्यास व मूल्यांकन करण्यासाठी केंद्र शासनाने संचालक पीसीपीएनडीटी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या तज्ञांच्या समितीची नवी दिल्ली येथे दिनांक २४/०८/२०१५ रोजी बैठक आयोजित केली होती. या बैठकीत समितीने केलेल्या शिफारशीनुसार ॲक्टीव्ह ट्रॅकर हे लिंग निदान प्रक्रियेस आळा घालण्यास उपयुक्त यंत्र नसल्याने सोनोग्राफी सेंटरवर ॲक्टीव्ह ट्रॅकर बसविणेचा निर्णय शासनाच्या विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अर्थसंकल्पात मंजूर करुन वितरीत केलेला निधी विभागांनी खर्च केला नसल्याबाबत

**(१०) * ३४७१४ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने अर्थसंकल्पात मंजूर करुन वितरीत केलेला निधी त्या-त्या आर्थिक वर्षात ज्या विभागांनी खर्च केला नाही असा अखर्चित निधी संबंधित विभागाने राज्य शासनाकडे जमा करावा असे आदेश सर्व शासकिय विभाग, कार्यालये व स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती शासकीय विभाग, कार्यालये तसेच जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका व प्राधिकरणे यांनी आतापर्यंत अखर्चित निधी शासनाकडे जमा केला आहे,

(३) असल्यास, शासनाने विकास कामांसाठी दिलेला निधी विहित कालावधीत खर्च न करता अखर्चित राहण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय हे खरे आहे.

(२) राज्यातील एकूण ३२ जिल्हा परिषदांनी त्यांचेकडील अखर्चित निधी शासनाकडे जमा केला आहे.

(३) तांत्रिक व प्रशासकीय कारणांमुळे तसेच न्यायालयीन प्रकरणे इ.स्वरूपाच्या कारणांमुळे अखर्चित राहिलेला आहे.

-----------------

## राज्य शासनाने घेतलेल्या कर्जाच्या विनियोगाबाबत

**(११) * ३५३५३ श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सन २०१४-१५ मध्ये ५०,२३३/- कोटी रूपये, सन २०१५-१६ मध्ये ५३,६९१/- कोटी रूपये व सन २०१६-१७ मध्ये ७१,७३४/- कोटी रूपये कर्ज घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्जाचा विनियोग कशाप्रकारे करण्यात आला आहे याबाबतची माहिती लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मागविली असता ती उपलब्ध नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कर्ज रक्कमांमधुन किती निधी भांडवली गुंतवणुकीवर वापरण्यात आला आहे व त्याचा बाबनिहाय तपशील काय आहे ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय हे खरे आहे. सन २०१६-१७ मध्ये रू.७१,७३४ कोटीचे कर्ज उभारण्याबाबतचे सुधारित अंदाज आहेत.

(२) मा.श्री.धनंजय मुंडे, विरोधी पक्षनेता, विधान परिषद यांना कर्जाच्या विनियोगाबाबत उपलब्ध असलेली माहिती, पत्र क्र. संकिर्ण - १७१७/ प्र.क्र.४७/ ऋण व हमी, दिनांक २२/११/२०१७ अन्वये देण्यात आली आहे. नाबार्ड (RIDF व LTIF), राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ तसेच बाहय सहाय्यित प्रकल्पाकरीता प्राप्त होणारी कर्जे संबधित प्रशासकिय विभागांतर्गत विशिष्ट प्रकल्प/ योजना याकरीता प्राप्त होतात. या व्यतिरिक्त खुल्या बाजारातुन उभारलेली कर्जे तसेच राष्ट्रीय अल्पबचत निधी कर्जाची रक्कम राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा करण्यात येते. सदर प्राप्त झालेले कर्ज अर्थसंकल्पीय तरतुदीव्दारे प्रशासकिय विभागांना विविध बाबींवर खर्च करण्याकरीता उपलब्ध करण्यात येते.

(३) संबंधित आर्थिक वर्षात कर्जाची परतफेड वजा जाता निव्वळ कर्ज रक्कमेमधुन सन २०१४-१५ मध्ये ३१,८२६.९६ कोटी, सन २०१५-१६ मध्ये २८,३८०.६७ कोटी व सन २०१६-१७ मध्ये ३८,५९६.४२ कोटी इतकी भांडवली

गुंतवणूक व महसूली तुट भरून काढण्याकरीता तरतूद करण्यात आली आहे. भांडवली गुंतवणूकीचा बाबनिहाय तपशील दर्शविणारा तक्ता सोबत जोडण्यात आला आहे.

भांडवली गुंतवणुकीचा बाबनिहाय तक्ता

| | | | (रुपये कोटीत) |
|---|---|---|---|
| बाब | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
| सर्वसाधारण सेवांचा भांडवली खर्च | ८६५.३१ | १२५९.२८ | १५४८.२३ |
| शिक्षण, क्रीडा, कला व संस्कृती यावरील भांडवली खर्च | ९५.८१ | ११४.१९ | ५२.२८ |
| आरोग्य व कुटुंब कल्याण यावरील भांडवली खर्च | ४६९.५४ | ६५०.६४ | ६०२.३७ |
| पाणीपुरवठा, स्वच्छता, गृह निर्माण व नगर विकास यावरील भांडवली खर्च | ४६६.६९ | ९५०.०१ | ६५८.२७ |
| माहिती व ध्वनी प्रसारण यावरील भांडवली खर्च | | | |
| अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती इतर मागासवर्गीय व अल्प संख्यांक यांचे कल्याण यावरील भांडवली खर्च | ७५१.९२ | ७०९.२६ | ४०१.०५ |
| समाजकल्याण व पोषण आहार यावरील भांडवली खर्च | ५४.८१ | ७७.६७ | २६.८९ |
| इतर सामाजिक सेवा यावरील भांडवली खर्च | ११९.०६ | ८२.४३ | १५२५.६६ |
| कृषी व संलग्न कार्यक्रम यावरील भांडवली खर्च | ३४५७.१७ | ३१२५.७४ | ३३९६.४० |
| ग्रामविकास यावरील भांडवली खर्च | ९३४.८९ | १४६३.८५ | १६८६.९५ |
| विशेष क्षेत्र कार्यक्रम यावरील भांडवली खर्च | ६३.७१ | ५८.१० | ८३.५३ |

| | | | |
|---|---|---|---|
| पाटबंधारे व पूर नियंत्रण यावरील भांडवली खर्च | ७०११.२३ | ८०६१.७९ | ८७६४.२० |
| ऊर्जा यावरील भांडवली खर्च | १३४२.३५ | १३७९.०६ | ६५८.१० |
| उद्योग व खनिजे यावरील भांडवली खर्च | ११६.२१ | ७२.०६ | ११२.२४ |
| वाहतुक यावरील भांडवली खर्च | ३६९९.८५ | ४७२५.४६ | ५४६१.२३ |
| विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण यावरील भांडवली खर्च | | | |
| सर्वसाधारण आर्थिक सेवा यावरील भांडवली खर्च | ७४.९४ | ६३.६१ | ५५१.३९ |
| राज्य शासनानी दिलेली कर्जे (निव्वळ) | १६५.४७ | २४९.५२ | ४५३१.६३ |
| महसूली तुट | १२१३८.०० | ५३३८.०० | ८५३६.०० |
| **एकूण** | **३१८२६.९६** | **२८३८०.६७** | **३८५९६.४२** |

-----------------

## राज्यात स्वाईन फ्ल्यू, डेंग्यू, लेप्टोस्पायरोसिस व मलेरियाची अनेक जणांना लागण झाल्याबाबत

**(१२) * ३४८२५ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, आर्कि.अनंत गाडगीळ, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जानेवारी ते सप्टेंबर, २०१७ या कालावधीत ४८१० जणांना स्वाईन फ्ल्यू, डेंग्यू व मलेरियाची लागण झाली असून स्वाईन फ्ल्यूने ५१९ जणांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई, ठाणे, पुणे व नागपूर जिल्ह्यात माहे जानेवारी ते सप्टेंबर, २०१७ या कालावधीत डेंग्यूचे ६०० रुग्ण व लेप्टोस्पायरोसिसचे ७० रुग्णांना लागण झाली असून १० जणांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रुग्णांना वेळीच औषधोपचार न मिळाल्यामुळे रुग्ण दगावल्याच्या तक्रारी त्यांच्या नातेवाईकांनी शासनाकडे करुनही त्याची दखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने विविध साथींच्या रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व औषधोपचाराअभावी मृत्यू झालेल्या रुग्णांच्या वारसास आर्थिक सहाय्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात जानेवारी ते सप्टेंबर, २०१७ या कालावधीतील स्वाईन फ्ल्यू आणि डेंग्यू व मलेरियाचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | आजार | रुग्ण | मृत्यू |
|---|---|---|---|
| १. | स्वाईन फ्ल्यू | ५५६६ | ६२० |
| २. | डेंग्यू | २९४८ | ८ |
| ३. | मलेरिया | १३०२१ | ११ |

(२) हे अंशत: खरे आहे.

मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर येथील जानेवारी ते सप्टेंबर, २०१७ या कालावधीतील साथरोग परिस्थिती पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | जिल्हा/ मनपा | डेंग्यू | | लेप्टो | | मलेरिया | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रुग्ण | मृत्यू | रुग्ण | मृत्यू | रुग्ण | मृत्यू |
| १. | मुंबई/ मनपा | ७०५ | ५ | २०९ | ७ | ४५०८ | १ |
| २. | पुणे | ८५३ | ० | ११ | १ | ७६ | ० |
| ३. | ठाणे | १११ | १ | ४ | ३ | २०६५ | १ |
| ४. | नागपूर | ९५ | ० | ६ | ० | ६७ | ० |

(३) हे खरे नाही.

(४) होय.

साथरोग प्रतिबंध व नियंत्रणासाठी खालील स्वरुपाच्या उपाययोजना राबविण्यात येतात

- राज्यस्तरीय संसर्गजन्य रोग प्रतिबंधक सल्लागार समितीच्या नियमित बैठका
- साथरोगाचे नियमित सर्वेक्षण
- किटकजन्य अजारासाठी कीटकशास्त्रीय सर्वेक्षण
- आवश्यक औषधाचा पुरेसा साठा
- स्वाईन फ्ल्यू साठी अतिजोखमीच्या व्यक्तींचे लसीकरण
- रुग्ण उपचाराची सुविधा
- निदानासाठी प्रयोगशालेय सुविधा
- एकात्मिक कीटक व्यवस्थापन
- प्रभावी नियंत्रणासाठी आंतरविभागीय समन्वय
- साथरोग संदर्भात जनतेचे आरोग्य शिक्षण

साथरोगामध्ये मृत्यूमुखी पडलेल्या रुग्णाच्या वारसास आर्थिक सहाय्य देण्यासाठी कोणतीही शासकीय योजना नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहर, उपनगर आणि ग्रामीण भाग या परिसरात बोगस डॉक्टर कार्यरत असल्याबाबत

**(१३) * ३५९३२ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर, उपनगर आणि ग्रामीण भाग या परिसरात मिळून ११० बोगस डॉक्टर कार्यरत असल्याची माहिती माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बोगस डॉक्टरांवर महापालिका आणि जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील अधिकारी कारवाई करण्यास दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महापालिका स्तरावर बोगस वैद्यकीय व्यवसायीक शोध मोहिम अंतर्गत आजपर्यंत २४ वैद्यकीय व्यवसायीकांवर कारवाई करण्यात येऊन संबंधित पोलीस स्टेशनमध्ये एफ.आय.आर. दाखल करण्यात आले आहेत. त्यापैकी ४ प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

पुणे जिल्हयातील सर्व तालुका समितीने त्यांच्याकडे नोंद झालेल्या २१ बोगस डॉक्टरांची माहिती दिली होती. त्यानुसार पुणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील सर्व तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत आजपर्यंत २१ बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांच्यावर पोलीस कारवाई करण्यात आली. सदर २१ बोगस डॉक्टरांपैकी २० बोगस डॉक्टरांवर वेगवेगळया पोलीस स्टेशनमध्ये एफ.आय.आर. दाखल करण्यात आले आहेत.

तसेच, खेड तालुक्यातील एका बोगस डॉक्टरवर एफ.आर.आय. दाखल करण्यासाठी पोलीस स्टेशन खेड येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे.
(३) पुढील तपास पोलीस विभागामार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सुपे वळवणे (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची भिंत कोसळून शाळेची दुरवस्था झाल्याबाबत

**(१४) * ३५९९६ श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुपे वळवणे (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची भिंत कोसळून शाळेची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शाळेतील जागेअभावी उन्हात वर्ग घेतले जात असल्याने पालक मुलांना शाळेत पाठवत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतचे वर्ग मंदीरात भरवण्यात येत आहेत. सदर शाळेत पटसंख्या १०० इतकी असून सरासरी उपस्थिती ९२% आहे. जागे अभावी मुलांना उन्हात बसविले जात नाही.
(३) शाळा तपासणी अंती ४ वर्ग खोल्यांचे निर्लेखनास मंजूरी दिलेली आहे. शाळेकरिता नवीन वर्ग, खोल्या बांधकाम करण्यासाठी कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विजाभज, इमाव व विमाप्र विभागामार्फत चालविण्यात येत असलेल्या आश्रमशाळेतील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करणेबाबत

**(१५) * ३५६२५ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक २२६७३ ला दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विजाभज, इमाव व विमाप्र विभागामार्फत चालविण्यात येत असलेल्या आश्रमशाळांमधील शिक्षक विद्यार्थी संख्येअभावी अतिरिक्त झाले असून सदर विभागातील अतिरिक्त झालेल्या शिक्षकांचे समायोजन होईपर्यंत शिक्षकांना वेतन अदा केले जावे असे मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी शासनास आदेशित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विभागाच्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या वाढत नसल्याने सदर अतिरिक्त झालेल्या शिक्षकांचे समायोजन या विभागाच्या शाळांमध्ये झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतून अतिरिक्त झालेले कर्मचारी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळेत समायोजित करणे, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळेतून अतिरिक्त झालेले शिक्षक खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेत समायोजन करणेबाबत आदेशित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शालेय शिक्षण विभागाचा दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजीचा निर्णय विजाभज व इमाव व विमाप्र विभागामार्फत चालविल्या जात असलेल्या आश्रम शाळांना लागू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे असे आदेश नाहीत. तथापि, विदयार्थी संख्या कमी झाल्यामुळे आश्रमशाळेचा एखादा वर्ग कमी झाल्यास परंतु सदर आश्रमशाळा सुरु असल्यास अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे महाराष्ट्र खाजगी शाळा मधील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम २६ व २७ नुसार वेतन अदा करण्यात येत आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) व (५) सदरहू प्रकरणी विचारविनिमय सुरु आहे.

-----------------

## मुंबईसह राज्यामध्ये खाजगी पॅथॉलॉजी लॅब रुग्णांच्या तपासण्यासाठी जादा दर आकारत असल्याबाबत

**(१६) * ३४६८३ श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यामध्ये डेंग्यू तसेच इतर साथीच्या आजारांच्या रक्ताच्या तपासणीसाठी खाजगी पॅथॉलॉजी लॅबकडून वेगवेगळे दर आकारले जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रक्त तपासण्यासाठी प्रत्येकी ६०० रुपयांपेक्षा जास्त शुल्क आकारण्यात येऊ नये असे शासनाचे आदेश असतानाही रुग्णांकडून खाजगी पॅथॉलॉजी लॅबमध्ये तपासणीसाठी रुपये ८००/- ते १५००/- शुल्क आकारीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार किती पॅथॉलॉजी लॅबवर कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच शासनाने दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी काढलेल्या आदेशाची दरपत्रिका प्रत्येक खाजगी पॅथॉलॉजीमध्ये लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, अशा प्रकारे सामान्य नागरिकांची आर्थिक पिळवणूक थांबविण्यासाठी खाजगी पॅथॉलॉजींना आरोग्य विभागाच्या अखत्यारीत घेण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली जात आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

डेंग्यू निदानासाठी शासन निर्णयाप्रमाणे निश्चित शुल्क आकारण्याच्या सूचना खाजगी पॅथॉलॉजींना देण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णय हा केवळ डेंग्यू आजाराच्या विशिष्ट तपासणीबाबत आहे.
(२) होय.
(३) होय. मुंबईतील एका खाजगी पॅथॉलॉजीमध्ये डेंग्यू चाचणीसाठी ६०० रुपयांपेक्षा जास्त शुल्क आकारल्याची बाब एका तक्रारीद्वारे निदर्शनास आली आहे. विभागीय वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्यामार्फत सदर खाजगी प्रयोगशाळेस ACHW/६११/MOH/SR अन्वये दिनांक ०५/१२/२०१६ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.
(४) डेंग्यू चाचणीसाठी ६०० रुपये दर निश्चिती करण्याचा शासन निर्णय काढण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ब्रम्हगव्हाण उपसा जलसिंचन योजनेबाबत

**(१७) * ३५३७९ श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ३२१६८ ला दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण तालुक्यातील ५५ गावातील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी सन २००९ मध्ये २२२ कोटी रुपयांची ब्रम्हगव्हाण उपसा जलसिंचन योजना मंजुर केली असुन ही योजना पुर्ण झाल्यास किमान ५५ गावांना सिंचन व पिण्यासाठी पाणी मिळणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेवर आतापर्यंत फक्त रुपये ९७ कोटी खर्च झाला असुन रुपये २५० कोटी रुपयांची आवश्यकता असून योजनेच्या कामासाठी सन २०१७-१८ मध्ये फक्त ५ कोटी रुपयांची तरतुद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा प्रकल्प पुर्ण करण्यासाठी आवश्यक असणारा निधी रुपये २५० कोटी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजनेद्वारे पैठण तालुक्यातील ५५ गावांच्या एकूण १८७८७ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणे संकल्पित आहे. या उपसा सिंचन योजनेत ५५ गावाच्या पिण्याच्या पाण्याचा समावेश नाही.

(२) होय.

या योजनेची अद्ययावत किंमत रुपये ५२१.१३ कोटी असून या योजनेवर आतापर्यंत (ऑक्टोंबर २०१७ अखेर) रुपये १३९.३६ कोटी खर्च झाला आहे. योजनेची ०१/११/२०१७ रोजीची उर्वरीत किंमत रुपये ३८१.७७ कोटी इतकी आहे. सन २०१७-१८ करिता रुपये ५ कोटीची तरतूद केली हे खरे आहे.

(३) व (४) राज्याच्या अर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपाल महोदयांच्या निर्देशानुसार मराठवाडा विभागास उपलब्ध होणारा निधी तसेच प्रकल्पाचे सद्य:स्थितीनुसार प्राधान्यक्रम विचारात घेऊन निधी उपलब्ध करूण देण्यात येईल.

-----------------

## जीएसटीच्या अंमलबजावणीसाठीचे परिपत्रक काढण्यास विलंब केल्यामुळे मुंबई महानगरपालिकेला होणाऱ्या नुकसानीबाबत

**(१८) * ३५३६९ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर** : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जीएसटीच्या अंमलबजावणीसाठीचे परिपत्रक काढण्यास राज्य शासनाने विलंब केल्यामुळे मुंबई महानगरपालिकेला तब्बल पाच ते सहा हजार कोटी किंमतीच्या निविदा रद्द कराव्या लागणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेला होणाऱ्या नुकसानीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार** : (१) नाही. जीएसटी अंमलबजावणीनंतर शासकीय कंत्राटामध्ये होणाऱ्या बदलाबाबत परिपत्रक दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ व दिनांक ११ सप्टेंबर, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आले. जीएसटी अंमलबजावणीनंतर कंत्राट सरसकटपणे रद्द न करता बदललेल्या कराच्या भाराबाबत कंत्राटदाराशी वाटाघाटी करुन कंत्राटाबाबत निर्णय घेण्यात यावा असे स्पष्टीकरण परिपत्रकामध्ये देण्यात आले आहे.

(२) लागू नाही.

(३) लागू नाही.

-----------------

## राज्यातील बालकल्याण समितीने बालगृहात वास्तव्यास असलेल्या बालकांचे प्रवेश रद्द करण्याच्या धोरणाबाबत

**(१९) * ३५८५९ डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालविकास विभागाच्या तत्कालीन आयुक्तांनी बाल न्याय अधिनियम २०१५ च्या अनुषंगाने दिनांक १ जून, २०१६ रोजी काढलेल्या परिपत्रकामुळे राज्यातील बालकल्याण समितीने बालगृहात वास्तव्यास असलेल्या बालकांचे प्रवेश रद्द करण्याचे धोरण राबविले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ६० हजाराहून अधिक अनाथ मुले/ मुली बाधित झाली असून त्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अनाथ मुला-मुलींचे भविष्य विचारात घेता शासनाने सदर परिपत्रक रद्द करुन अनाथ मुलामुलींचे वसतिगृहात प्रवेश सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही,

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम २ (१४) मध्ये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांची व्याख्या दिलेली आहे. या व्याख्येमध्ये बसणाऱ्या बालकांनाच अंतिम पर्याय म्हणून बालगृहामध्ये प्रवेश देणे बाबतच्या सूचना आयुक्तालयाचे परिपत्रक क्र. २४२, दिनांक ०१ जून, २०१६ अन्वये देण्यात आलेल्या आहेत.

तथापि, बालकल्याण समितीकडून संस्थांमध्ये दाखल करण्यात आलेल्या बालकांच्या प्रकरणांचा आढावा घेण्यात आला व ज्या बालकांचे पालक बालकांची काळजी घेण्यास सक्षम आहेत अशी बालके कुटूंबात पुन:स्थापित करण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील पॅथॉलॉजी लॅबमध्ये रूग्णांची लुट सुरु असल्याबाबत

**(२०) * ३५९३७ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील धंतोली, बर्डी, रामदासपेठ, मेडीकल चौक, सेंट्रल एवेन्यू, सक्करदरा, इतवारी परिसरात पॅथॉलॉजी लॅबमध्ये रक्त तपासणी, मल मूत्र तपासणी शुल्क वेगवेगळे असल्याने गरीब रूग्णांची पॅथॉलॉजी लॅब संचालकाकडून लुट सुरु असल्याचे दिनांक २२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पॅथॉलॉजी लॅब संचालकाकडून होणाऱ्या लुटीवर शासन निर्बंध घालणार आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्रादेशिक मनोरूग्णालयातील बाहयरूग्ण विभागात झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(२१) * ३५४०३ श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील प्रादेशिक मनोरूग्णालयातील बाहयरूग्ण विभागात उपचारासाठी येणाऱ्या मनोरूग्णांकडून ४० रूपयांऐवजी ८० रूपये शुल्क घेवून रूग्णांची लुट होत असल्याचे दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून, प्राथमिक चौकशी अहवालानुसार दोषी आढळलेल्या कनिष्ठ लिपिकास निलंबित करण्यात आले आहे. तसेच याबाबत पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आरे-वारे (जि.रत्नागिरी) समुद्रकिनारी येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेसाठी जीवरक्षकसह अद्यावत सुविधा नसल्याबाबत

**(२२) * ३५६७५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह : तारांकित प्रश्न क्रमांक ३०९८६ ला दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील आरे-वारे समुद्रकिनारी येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेसाठी जीवरक्षकसह अद्यावत सुविधांचा अभाव असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वायरी समुद्रकिनारी झालेल्या दुर्घटनेनंतर जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाकडून ५० लाखांचा स्वतंत्र आराखडा तयार करण्यात आल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही दिवसांपूर्वी याच ठिकाणी भरतीच्या पाण्यात फसलेल्या पाच पर्यटकांपैकी एकाचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी व पर्यटनाच्यादृष्टीने अद्यावत सोयीसुविधा पुरविण्यासाठी शासन काही ठोस उपाययोजना करणार आहे काय ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

रत्नागिरी जिल्ह्यातील आरे व वारे या दोन लगतच्या समुद्रकिनाऱ्यांपैकी आरे समुद्रकिनारी पोहावयास गेलेल्या ५ पर्यटकांपैकी एका पर्यटकाचा बुडून मृत्यू झालेला आहे.

(४) राज्यातील समुद्रकिनाऱ्यांवरील (बीचेस) पर्यटकांच्या सुरक्षाव्यवस्थेसाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत दिनांक ०८/०९/२००६ च्या शासन निर्णयान्वये नियमावली तयार केलेली आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार उपाययोजना करावयाचे समुद्रकिनारे (बीचेस) निश्चित करण्यात आले आहेत. यानुसार शासनस्तरावर निश्चित केलेल्या समुद्रकिनाऱ्यांपैकी ग्रामीण भागातील समुद्रकिनाऱ्यांसाठी ग्राम विकास विभाग व शहरी/ नागरी भागासाठी नगर विकास विभाग हे अंमलबजावणी यंत्रणा आहेत.

राज्यातील समुद्रकिनाऱ्यांवरील (बीचेस) पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी करावयाच्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीबाबत मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेच्या अनुषंगाने सन २०१६-१७ मध्ये पर्यटन विभागामार्फत रत्नागिरी जिल्ह्यातील निश्चित केलेल्या समुद्रकिनाऱ्यावरील (बीचेस) सुरक्षाव्यवस्थेसाठीच्या साधनसामग्रीकरीता रुपये ५३.८५ लक्ष व जीवरक्षक प्रशिक्षणासाठी रुपये ६.४६ लक्ष निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

तर सिंधुदुर्ग जिल्हयासाठी साधनसामग्रीकरीता रुपये ४३.८५ लक्ष व जीवरक्षक प्रशिक्षणासाठी ६.४६ लक्ष उपलब्ध करुन दिले आहेत.

तसेच ग्राम विकास विभागाने सिंधुदुर्ग जिल्हयासाठी रुपये ५५.०० लक्ष व रत्नागिरी जिल्हयासाठी रुपये ५४.०५ लक्ष रकमेचा निधी मंजूर केला आहे. तसेच ठरवून दिलेल्या बीचवर जीवरक्षकांच्या मानधनाकरीता रुपये १.४४ लक्ष निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्याचप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्हयाने जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत रुपये १६६.६३ लक्ष निधी मंजूर केला आहे.

ठरवून दिलेल्या बीचेसवर माहिती फलक, दिशादर्शक फलक, धोक्याच्या सूचना देणारे फलक, आपत्कालीन प्रसंगी प्रथमोपचाराची माहिती देणारे फलक, धोक्याची सूचना देण्याकरीता सायरन, बीचेसवर प्रकाश व्यवस्था, फ्लड लाईटस्, टेहळणी मनोरे (वॉच टॉवर्स) इत्यादी व्यवस्था केलेल्या आहेत.

राज्यातील समुद्र किनाऱ्यांवर येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षा व्यवस्थेसंदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्रमांक ८९/२०१० दाखल असून ती न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## वसई (जि.पालघर) तालुक्यात अर्नाळा, सुरुची बाग व राजोडी समुद्र किनाऱ्यावर पर्यटकांसाठी सुरक्षा व्यवस्था करण्याबाबत

**(२३) * ३५३२३ श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यात अर्नाळा, सुरुची बाग व राजोडी समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांसाठी सुरक्षा व्यवस्था करणेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांच्या सुरक्षाविषयक उपाययोजनेसाठी प्रधान सचिव, पर्यटन विभाग यांच्याकडे रुपये ३,१५,८५०/- एवढा निधी शासनाने उपलब्ध करुन दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) होय.
(३) वसई तालुक्यातील अर्नाळा, सुरुची बाग व राजोडी समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांसाठी सुरक्षा व्यवस्था करणेसाठी जीवरक्षक नेमणे, वाहनतळ निश्चित करणे, घनकचरा व्यवस्थापन, माहिती फलक लावणे, इ. उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तसेच सुरक्षाविषयक लाईफ जॅकेट, मेगा फोन, लाईफ बोट, वॉच टॉवर, इ. साहित्य खरेदीसाठी प्रति बीच रुपये ३,१५,८५०/- प्रमाणे निधी मंजूर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य कामगार विमा योजनेंतर्गत तात्पुरत्या स्वरूपातील परिचारीकांना कायम करणेबाबत

**(२४) * ३५४११ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य कामगार विमा योजनेच्या महात्मा गांधी मेमोरियल नर्सिंग स्कुल मधून उत्तीर्ण झालेल्या १२१ परिचारीका मागील २ ते ९ वर्षापासून तात्पुरत्या स्वरूपात विमा कामगार योजनेत कार्यरत आहेत, परंतु आयुक्त कार्यालय (कामगार विमा योजना) किंवा शासनाने त्यांना अद्यापपर्यंत कायम करण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिचारीकांना कायम करण्याऐवजी आयुक्त कार्यालयाने माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान नवीन भरती प्रक्रिया सुरू केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी आयुक्त, राज्य कामगार विमा व मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्यास्तरावरून कोणती कार्यवाही व उपाययोजना करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१), (२) व (३) हे अंशतः खरे आहे.

महात्मा गांधी स्मारक रूग्णालय, परेल येथील उत्तीर्ण झालेल्या परिचारिकांची संख्या १२१ नसून ती १०३ आहे. राज्य कामगार विमा योजनेत परिचारिकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्यामुळे रूग्णसेवेत अडथळा होऊ नये याकरिता या एकूण १०३ परिचारिकांना तात्पुरत्या स्वरूपात ३६४ दिवसांच्या बंधपत्रित सेवेकरिता तात्पुरत्या स्वरुपात दोन नियुक्त्या वेळोवेळी देण्यात आल्या आहेत.

सदर परिचारिकांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे न्यायालयीन प्रकरण दाखल केले असून मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांच्या आदेशानुसार सदर परिचारीकांच्या सेवा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात पुढे सुरू ठेवण्यात आल्या आहेत. सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक २५/८/२००५ च्या परिपत्रकानुसार अशा तात्पुरत्या कर्मचाऱ्यांनी सेवेत नियमित स्वरूपात सामावून घेण्याची मागणी केल्यास ती मान्य करता येणार नाही, त्यामुळे या तात्पुरत्या स्वरुपात बंधपत्रित सेवेकरीता नियुक्ती दिलेल्या परिचारीकांच्या तात्पुरत्या सेवा नियमित करण्याबाबत कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

त्याचप्रमाणे राज्य कामगार विमा योजनेतील गट-क मधील पदे भरण्यासाठी राज्य कामगार विमा योजनेच्या स्तरावर शासनाचा उपक्रम असलेल्या मे.महाऑनलाईन लिमिटेड मार्फत गट-क मधील परिचारिका व समवैद्यकीय संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. दिनांक २५ व २६ सप्टेंबर, २०१७ रोजी स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. त्यामध्ये सदर परिचारीकांना परिक्षेमध्ये भाग घेऊन नियमित होण्याची संधी देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धामणी (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील धनगरदरा परिसरात दोन ठिकाणी ओढयावर पुल बांधण्याबाबत

**(२५) * ३४७३१ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणी (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील धनगरदरा परिसरातील ओढयावर दोन ठिकाणी पुल नसल्याने इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना पावसाळयात चार ते पाच महिने पाण्यातून वाट काढत शाळेत जावे लागते, तसेच ओढयातील पाण्यात साप व इतर विषारी जलचर आढळत असल्याने विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोन्ही ठिकाणी ओढयावर पुल बांधावा अशी मागणी विद्यार्थ्यांचे पालक व स्थानिक ग्रामस्थांनी तसेच लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे तसेच शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अशा प्रकारची मागणी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) धनगरदरा वस्तीकडे जाणारा ग्रामीण मार्ग क्र.८८ वर सा.क्र.१/५०० व सा.क्र.२/१०० या दोन ठिकाणी नाला क्रॅास होत असल्याने त्याठिकाणी पुल वजा साकव बांधकामाची आवश्यकता आहे. जिल्हा नियोजन समिती अंतर्गत ३०५४ लेखाशिर्षाखाली निधी व निकषाच्या अधिन राहून या दोन पुल वजा साकवांची कामे प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

तसेच जिल्हा नियोजन समिती अंतर्गत साकव बांधणे या कार्यक्रमांतर्गत सदरची कामे प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेने सार्वजनिक बांधकाम विभागास कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील डॉक्टरांनी बॉण्ड सेवेतून सूट घेऊन दंडात्मक रक्कम शासनाकडे जमा न केल्याबाबत

**(२६) * ३५८२४ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक तसेच पालिकेच्या कॉलेजमधून पदवी तसेच पदव्युत्तर पदविका, अतिविशेषोपचार पदवी प्राप्त केलेल्या डॉक्टरांनी ग्रामीण भागातील बॉण्ड सेवेतून सूट घेऊन दंडात्मक रक्कम शासनाकडे जमा न केल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही. दंडात्मक रक्कमेचा भरणा केला असला तरच बंधपत्रित सेवेतून सूट देण्यात येते.

(२) बंधपत्रित सेवा न केलेल्या उमेदवारांना संबंधित अधिष्ठातांमार्फत नोटीस जारी करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयातील साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत

**(२७) * ३५५७४ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात १११ जणांना डेंग्यूची लागण झाली असून पांगरी (ता.अर्धापूर, जि.नांदेड) येथील शेतकरी कुटूंबातील ९ वी इयत्तेत शिकणारी कु.रुतुजा गुलाबराव दुधाटे या मुलीचा डेंग्यूच्या आजाराने मृत्यू झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिका क्षेत्रात अस्वच्छतेमुळे डेंग्यूचे ४० रुग्ण आढळून आले असून शहरात मलेरिया तसेच चिकनगुनियाचे रुग्णही आढळून आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने साथींच्या रोगांचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत तसेच पांगरी येथील मृत मुलीच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

नांदेड जिल्हयात माहे जानेवारी ते सप्टेंबर, २०१७ या कालावधीत १४३ डेंग्यू रुग्ण आढळून आले असून कु.रुतुजा गुलाबराव दुधाटे या १४ वर्षाच्या मुलीचा डेंग्यू सदृश आजाराने मृत्यू झाला हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

माहे सप्टेंबर, २०१७ अखेर नांदेड महापालिका क्षेत्रात डेंग्यूचे ३८ रुग्ण आढळून आले आहेत, तसेच मलेरियाचे ३ रुग्ण आढळून आले आहेत. परंतु चिकनगुनियाचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही.

(३) मौजे पांगरी प्राथमिक आरोग्य केंद्र अर्धापूर येथे डेंग्यू उद्रेक जाहिर करुन दिनांक ११/०९/२०१७ ते दिनांक ३०/०९/२०१७ या कालावधीत रॅपीड रिस्पॉन्स टिम हजर ठेवून दैनंदिन प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत. साथरोगाने मृत झालेल्या रुग्णाच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्याचे शासनाचे कोणतेही धोरण नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हयातील कुष्ठरोगाचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत

**(२८) * ३४८०७ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयात कुष्ठरोग शोध मोहिमेत २५२ नवीन कुष्ठरोगाचे रुग्ण आढळून आले असून त्यामध्ये ४८ बालकांना या रोगाची लागण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच दिनांक ६ ते २१ सप्टेंबर, २०१७ या कालावधीत राबविण्यात आलेल्या कुष्ठरोग शोध अभियानांतर्गत केलेल्या पाहणीत यावर्षीही १४ बालकांना कुष्ठरोग झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कुष्ठरोगाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्याकरिता मोहिम आखणे वा अभियान राबविण्याव्यतिरिक्त कोण-कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत व त्यानुसार मागील ३ वर्षातील पुर्वीच्या किती रुग्णांचा कुष्ठरोग बरा झालेला आहे,
(४) तसेच राज्यात कुष्ठरोग निर्मूलनासाठी सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षासाठी एकूण किती आर्थिक तरतूद करण्यात आली व त्यामधून ठाणे व पालघर जिल्हयासाठी जिल्हानिहाय किती तरतूद केली व किती खर्च झालेला आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

दिनांक ६ ते २१ सप्टेंबर, २०१७ या कालावधीत राबविण्यात आलेल्या कुष्ठरोग शोध अभियानांतर्गत एकूण नवीन ३१४ रुग्ण शोधले असून त्यापैकी ७१ बालकांना कुष्ठरोगाची लागण झाली असून त्यापैकी १४ बालके सांसर्गिक प्रकारची व ५७ बालके असांसर्गिक प्रकारची आहेत. या सर्वांवर बहुविध औषधोपचार सुरु करण्यात आला आहे.

(३) ठाणे जिल्हयात ६ महानगरपालिका असून ९६ नागरी आरोग्य केंद्रे व २ पर्यवेक्षकिय नागरी कुष्ठरोग पथके कार्यरत आहेत. तसेच ग्रामीण भागात ३२ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ७ ग्रामीण रुग्णालये कार्यरत आहेत.

१) शहरी भागात अवैस यांचेमार्फत जोखमीच्या भागात सर्वेक्षण करुन संशयित रुग्ण शोधून वैदयकिय अधिकारी यांच्या निदान निश्चितीनंतर त्यांना बहुविध औषधोपचार दिला जातो.

२) ग्रामीण भागात आरोग्य कर्मचारी व आशा यांच्यामार्फत संशयित रुग्ण शोधून वैद्यकिय अधिकारी यांच्या निदान निश्चिती नंतर त्यांना बहुविध औषधोपचार दिला जातो.

३) नविन शोधलेल्या सर्व कुष्ठरुग्णांच्या सहवासितांची तपासणी केली जाते.

४) सांसर्गिक रुग्ण व कुष्ठरुग्ण मुले आढळलेल्या ठिकाणी ग्रामीण भागात संपूर्ण गावचा व शहरी भागात आजूबाजूच्या ३०० घरांतील व्यक्तिची कुष्ठरोगासाठी तपासणी केली जाते.

५) राज्यात ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालय तत्वावर २१९ कुष्ठरोग संदर्भ सेवा केंद्र आहेत. त्यापैकी ठाणे जिल्हयात १५ संदर्भ सेवा केंद्रे आहेत. यामार्फत कुष्ठरुग्णांना आवश्यकतेनुसार विकृती प्रतिबंध व वैद्यकीय पुनर्वसन सेवा दिल्या जातात.

६) कार्यक्षेत्रात विविध आरोग्य शिक्षण व जनजागृतीचे कार्यक्रम करुन समाजात कुष्ठरोगाविषयी जनजागृती केली जाते.

मागील ३ वर्षात ठाणे जिल्हयात व महाराष्ट्र राज्यात बहुविध औषधोपचाराने बऱ्या झालेल्या कुष्ठरुग्णांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

मागील ३ वर्षात बरा झालेल्या कुष्ठरुग्णांची संख्या
(१ एप्रिल ते ३१ मार्च)

| | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | माहे ऑक्टो १७ अखेर |
|---|---|---|---|---|
| ठाणे | १२३५ | १०७६ | ९२२ | ७३१ |
| महाराष्ट्र | १५७५२ | १६७८२ | १५१०७ | ८७५४ |

(४) राज्यात कुष्ठरोग निर्मुलनासाठी महाराष्ट्र राज्याकरिता तसेच ठाणे व पालघर जिल्हयाकरिता राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राज्य कुष्ठरोग सोसायटी व महाराष्ट्र शासन असे खालीलप्रमाणे अनुदान मंजूर झाले आहे.

राज्य कुष्ठरोग सोसायटी

| | ठाणे | | पालघर | | महाराष्ट्र राज्य | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पी.आय.पी (रुपये लक्ष) | खर्च (रुपये लक्ष) | पी.आय.पी (रुपये लक्ष) | खर्च (रुपये लक्ष | पी.आय.पी (रुपये लक्ष) | खर्च (रुपये लक्ष) |
| २०१६-१७ | १४१.४१ | ९२.९० | ५०.४६ | ५०.०७ | १६६० | १०८६.२६ |
| २०१७-१८ ऑक्टो-१७ | ९८.२१ | १०.१८ | ४६.८६ | ०.१३ | १५८९ | २२०.१९ |

पालघर जिल्हयाकरिता सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) कार्यालय मंजूर नसलेल्या राज्य स्तरावरील अनुदान ठाणे जिल्हयामार्फत खर्च करण्यात येते.

राज्य शासन अनुदान

| | ठाणे (ठाणे व पालघर एकत्रित) | | महाराष्ट्र राज्य | |
|---|---|---|---|---|
| | प्राप्त अनुदान | खर्च | प्राप्त अनुदान | प्राप्त अनुदान खर्च |
| २०१६-१७ | ४,८३,१०,००० | ४,८०,८५,००० | ७६,७९,०९,००० | ६४,२०,६५,००० |
| २०१७-१८ ऑक्टो-१७ | ४,३२,३२,००० | ३,१३,७५,००० | ६०,६८,३०,००० | ४२,५२,८५,००० |

----------------

## लाखांदूर (जि.भंडारा) येथील रोजगार हमी योजनेवरील मजूरांची मजूरी मजुरांच्या खात्यात जमा करण्याबाबत

**(२९) * ३५६३६ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खैरी (पट), टेंभरी, विहीरगांव, आवळी, गवराळा, मोहरणा, डांभेविरली (ता.लाखांदूर, जि.भंडारा) या गावातील रोजगार हमी योजनेवरील अनेक मजूरांची मजूरी नियमाप्रमाणे निर्धारित वेळेत मजुरांच्या खात्यात जमा होत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मजूरांना गेल्या ६ महिन्यांपासून मजूरीचे पैसे मिळालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

(२) लाखांदूर तालुक्यातील खैरी (पट), टेंभरी, विहीरगांव, आवळी, गवराळा, मोहरणा, डांभेविरली या ठिकाणी रोजगार हमी योजनेवरील काम करणाऱ्या सर्व मजुरांची मजूरी ऑक्टोबर, २०१७ चे दरम्यान त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील इतर मागासवर्गीयांच्या शिष्यवृत्ती, आरक्षण तसेच समाजाच्या विकासासाठी कार्यवाही करण्याबाबत

**(३०) * ३५०३८ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इतर मागासवर्गीयांच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये ओबीसी मंत्रालयाची स्थापना करुनही चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यात कमी करण्यात आलेले ओबीसींचे आरक्षण पूर्ववत झालेले नाही तसेच मागील २ वर्षापासून ओबीसी विद्याथ्यांना उच्च शिक्षण विभागाची शिष्यवृत्ती मिळाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये ओबीसी प्रवर्गात असलेल्या जातींना वेगवेगळे आरक्षण देण्यात आले आहे काय व चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात ओबीसी समाज मोठ्या प्रमाणात असताना याच विभागात ओबीसीचे आरक्षणाचे टक्केवारी कमी करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शिष्यवृत्ती व आरक्षणाबाबत तसेच समाजाच्या विकासासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१), (२) व (३) अनुसूचित जमातीसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात् आदिवासी समाजातील लोकांना स्थानिक नोकऱ्यांमध्ये अधिक संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने गट क व गट ड मधील पदाकरीता चंद्रपुर व गडचिरोली जिल्ह्यात अन्य मागासवर्गीयांचे आरक्षण काही प्रमाणात कमी करुन चंद्रपुर जिल्ह्यात अनुसुचित जमातीसाठी १५% व गडचिरोली जिल्ह्यात २४% वाढीव आरक्षण दिलेले आहे. हे आरक्षण एकुण ५२% आरक्षणाच्या मर्यादेत आहे. खुल्या प्रवर्गासाठी ४८% आरक्षण आहे. त्यामध्ये ही अन्य मागासवर्गीय स्पर्धा करु शकतात.

असा निर्णय सामान्य प्रशासन विभागाने (मागासवर्गीय कक्ष) घेतला आहे. शिष्यवृत्तीत याबाबत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तसेच, इतर मागासवर्गीयांतील विद्यार्थ्यांची थकित शिष्यवृत्ती देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भातील सहायक प्रयोगशाळा तंत्रज्ञ व प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३१) * ३४८९० श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील ६ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयातील ५० सहाय्यक प्रयोगशाळा तंत्रज्ञांची पदोन्नतीची प्रकरणे तसेच प्रयोगशाळा तंत्रज्ञांची ५५ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहाय्यक प्रयोगशाळा तंत्रज्ञ व प्रयोगशाळा तंत्रज्ञांची पदे रिक्त असल्याने रुग्णांच्या विविध तपासण्यात अनेक अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार उक्त संवर्गातील रिक्त असलेली पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) विदर्भातील एकुण ६ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांतील प्रयोगशाळा सहायक गट-क या संवर्गातील पदोन्नतीच्या कोटयातील मंजूर ५१ पदांपैकी १५ पदे रिक्त आहेत तर प्रयोगशाळा तंत्रज्ञ गट-क संवर्गातील पदोन्नतीच्या कोटयातील मंजूर १२६ पदांपैकी २३ पदे रिक्त आहेत. या सर्व महाविद्यालयांतील व रुग्णालयांतील सदर दोन्ही संवर्गातील सरळसेवा कोटयातील बहुतांशी पदे भरण्यात आलेली आहेत.

(२) प्रयोगशाळा सहायक व प्रयोगशाळा तंत्रज्ञ या संवर्गातील पदे काही प्रमाणात रिक्त असली तरी रुग्णांच्या विविध तपासण्या करण्यात अडचणी निर्माण झालेल्या नाहीत.

(३) गट-क तांत्रिक संवर्गातील पदोन्नतीच्या कोटयातील पदे भरण्यासाठी अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांना नोडल अधिष्ठाता म्हणून अधिकार बहाल करण्यात आले असून त्याद्वारे दिनांक ३०/१०/२०१७ पर्यंत प्रयोगशाळा तंत्रज्ञांची ३६ पदे पदोन्न्तीने भरण्यात आलेली आहेत. पदोन्नतीच्या आरक्षणासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणामुळे सद्य:स्थितीत ही पदे भरण्यात अडचण निर्माण झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील ३५ गाव पाणी योजनेस निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३२) * ३५४९१ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील ३५ गाव पाणी योजनेस तत्कालीन मा.राज्यपाल यांनी ना हरकत प्रमाणपत्र दिले असून राज्याच्या तत्कालीन मंत्रिमंडळाने त्यास प्रशासकीय मंजूरी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृष्णा खोरे विकास महामंडळाने या प्रकल्पासाठी निधी देणे योग्य आहे असा अनुकूल अहवाल दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेला आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत व सदर योजना मार्गी लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय, मंगळवेढा उपसा सिंचन योजना ता. मंगळवेढा जि.सोलापूर या योजनेस दोन टप्यात खास बाब म्हणून रुपये ५३०.०४ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१३/(१३५/२०१३)/ जसंनि, दिनांक ०६/०९/२०१४ अन्वये प्राप्त झालेली आहे.
(२) व (३) होय. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट असून प्रकल्पाची व्यवहार्यता तपासण्यासाठी महामंडळाकडील प्राप्त अहवाल राज्य तांत्रिक सल्लागार समिती यांचेकडे पाठविण्यात येत आहे. त्यांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतरच याबाबत पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून जलयुक्त शिवार योजनेची कामे पूर्ण करण्याबाबत

**(३३) * ३५५८४ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून जलयुक्त शिवार योजनेतील विहिर पुनर्भरणाची उपाययोजना राबविली जात असून सदर योजना राबविताना केवळ कामे झाल्याचे दाखविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जलयुक्त शिवार अभियानाच्या सन २०१७-१८ च्या आराखडयात १४४ गावांमध्ये ११२३ कामे प्रस्तावित असून त्यापैकी ८९० कामांना सुधारित मंजूरी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू कामे पावसाळयात किंवा त्यापूर्वी होणे अपेक्षित असतानाही अद्यापि कामे पूर्ण झाली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर व कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

अकोला जिल्हा परिषदेच्या कृषि विभागाकडून मनरेगा अंतर्गत विहीर पुनर्भरणाची कामे राबविली जात आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) गाव आराखड्यानूसार प्रस्तावित कामे एका वर्षात पूर्ण करावयाची आहेत. त्यानूसार मनरेगा अंतर्गत सुधारित आराखड्यातील ८९० कामापैकी ५६२ कामांना प्रशासकिय मान्यता दिली असून २३७ कामांचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत त्यापैकी ७५ कामे पूर्ण झाली असून १३२ कामे प्रगतीपथावर आहेत.

सद्य:स्थितीत शेतामध्ये पिके असल्यामुळे कामे थांबली असून मार्च, २०१८ अखेर आराखड्याप्रमाणे कामे पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (यवतमाळ) येथील विद्यार्थ्यांनी रँगिग केल्याबाबत

**(३४) * ३४७२१ श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (यवतमाळ) येथील एमबीबीएस व्दितीय वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्याला सहा तास गुडघ्यावर बसवून वरिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांनी रँगिग केल्याची घटना दिनांक १२ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाकडून त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशी समितीने श्री.अभिषेक शेंडे आणि इतर ६ विद्यार्थ्यांची चौकशी करुन समितीच्या अहवालातील निष्कर्षामध्ये श्री.अभिषेक शेंडे या विद्यार्थ्यांशी रॅगिंग किंवा शारिरीक व मानसिक त्रास देण्याची घटना घडली नसल्याचे नमूद केले आहे.

तसेच, स्थानिक पातळीवर अॅन्टी रॅगिंग समितीमार्फत चौकशी करण्यात आली आहे. त्या चौकशीमध्येसुध्दा विद्यार्थ्यासोबत कुठलाही अनुचित प्रकार घडलेला नाही असे नमूद करण्यात आले आहे. तथापि संस्थेची बदनामी झाल्यामुळे समितीने केलेल्या शिफारशीनुसार उक्त विद्यार्थी व इतर सहा विद्यार्थ्यांना सहा महिन्यापर्यंत वसतिगृहात प्रवेश देऊ नये असा निर्णय महाविद्यालय प्रशासनामार्फत घेण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेळघाट (जि.अमरावती) येथे बालमृत्यू तसेच मातामृत्यू रोखण्याबाबत

**(३५) * ३५४०४ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (जि.अमरावती) येथे सन १९९६ ते २०१७ या वर्षात एकूण ११ हजार ४३६ बालमृत्यू झाले असून सरासरी प्रत्येक वर्षाला ५१९ बालमृत्यू होत आहेत तसेच मातामृत्यूंचे प्रमाणही अधिक असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनस्तरावर बालमृत्यू तसेच मातामृत्यू प्रमाण रोखण्यासाठी कुठलाच प्रयत्न केला जात नसल्याचा आरोप येथील सामाजिक संस्था व संघटनाकडून केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बालमृत्यू व मातामृत्यू रोखण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

मेळघाट भागात (जि.अमरावती) मध्ये १९९७-९६ ते ३० सप्टेंबर २०१७ पर्यंत एकुण ० ते ६ वर्ष वयोगटातील ११६३५ बालमृत्यू तसेच २१३ मातामृत्यू झालेले आहेत.

(२) मेळघाटमध्ये बालमृत्यू व मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध उपाययोजना राबविल्या जातात. त्यामुळे हे प्रमाण कमी होत आहे.

(३) शासनाकडून बालमृत्यू व मातामृत्यू रोखण्यासाठी पुढील प्रमाणे उपाययोजना राबविल्या जातात :- बालमृत्यू तसेच मातामृत्यू रोखण्यासाठी उपाययोजना -

नवजात बालकांच्या उपचारासाठी नवजात आजारी कक्ष, नवजात शिशु स्थिरीकरण कक्ष, नवजात शिशु कोपरा, इंन्टेसिफाईड एचबीएनसी, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, बालमृत्यू अन्वेषण ० ते २ महीने वयोगटातील बालकांचे इंजेक्शन जेन्टामायसीन व सिरप ॲमॉक्सीलीन देऊन एएनएम मार्फत सेप्सीस रोगाचे व्यवस्थापन, आरोग्य संस्थामध्ये कांगारु मदर केअर पध्दतीचा वापर, बाल उपचार केंद्र, पोषण पुनर्वसन केंद्र, नवसंजीवनी अंतर्गत सॅम व मॅम बालकांची तपासणी व उपचार, राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रम, नियमित लसीकरण व मानव विकास कार्यक्रम.

संस्थात्मक प्रसुती, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, जननी सुरक्षा योजना, मानवविकास कार्यक्रमांतर्गत अतिजोखमीच्या मातांची तपासणी व औषधोपचार, मातृत्व अनुदान, माहेर घर योजना, प्रधानमंत्री मातृत्व सुरक्षा अभियानांतर्गत गरोदर मातांची व अतिजोखमीच्या मातांची तपासणी करुन औषधोपचार, आहार, शिक्षण व आवश्यकतेनुसार संदर्भ सेवा दिली जाते. याशिवाय पालघर जिल्हयातील ४ तालुक्यासाठी टास्क फोर्स तयार करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# जिल्हा सामान्य रुग्णालय (नाशिक) येथे सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३६) * ३४९८९ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा सामान्य रुग्णालय (नाशिक) येथे अपुऱ्या सोयी-सुविधांमुळे मागील ५ महिन्यात कुपोषणामुळे २२५ बालकांचा मृत्यू झाल्याचे समर्थन या संस्थेने मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कुपोषण व बालमृत्यू रोखण्यासाठी सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) दिनांक १९ सप्टेंबर २०१७ रोजी समर्थन या संस्थेने नाशिक जिल्हयात झालेल्या २२५ बालकांच्या मृत्यूबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिले आहे.

(२) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी उपआयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समितीची नेमणूक केली असून या समितीचा अहवाल दिनांक २९-९-२०१७ रोजी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे सादर केला आहे.

या चौकशीमध्ये पुढील बाबी आढळून आल्या-विशेष नवजात काळजी कक्ष, नाशिक येथील मृत्यूदर ८ टक्के आहे. विशेष नवजात काळजी कक्ष, नाशिक येथे दाखल झालेल्या अर्भकांची काळजी तेथील स्थानिक वैद्यकिय प्रशासनाकडून योग्य पद्धतीने होत आहे. माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये ५५ अर्भक मृत्यू झाले असून त्यापैकी अनुसूचित जमातीची बालके ६७ टक्के असून ७१ टक्के बालके ग्रामीण भागातील असून त्यापैकी ७२ टक्के बालके कमी

वजनाची आहेत. या ५५ मृत्यू पैकी ८४ टक्के कमी वजन, ५१ टक्के मुदत पूर्व प्रसूती, ३५ टक्के श्वसनाचा आजार (RDS), २० टक्के श्वसावरोध व ७ टक्के जंतूसंसर्गमुळे झालेले आहेत. गरोदर मातांना सर्व सेवा पुरविण्यात आल्या असून काही मातांचा बीएमआय १९ पेक्षा कमी आढळून आला. याबाबत मातेचा बॉडी मास इंडेक्स बाळासाठी योग्य आहे किंवा नाही याचे संनियंत्रण प्रत्येक स्तरावर करुन ते वाढविण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी अत्यंत काटेकोरपणे केल्यास बालमृत्यूदराचे प्रमाण आणि नवजात शिशू काळजी कक्षामध्ये दाखल होणाऱ्या मुलांच्या मृत्यूचे प्रमाण निश्चित कमी होऊ शकते इत्यादी.

विशेष नवजात काळजी कक्ष, नाशिक येथे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार मनुष्यबळ व विविध उपकरणे उपलब्ध आहेत. दाखल होणाऱ्या बालकांची संख्या व बेड ऑक्युपेन्सी दर लक्षात घेता अतिरिक्त १२ रेडियंन्ट वॉर्मर, २ फोटोथेरपी युनिट व २ सीपॅप मशिन पुरविण्यात आल्या असुन १८ अतिरिक्त स्टाफ नर्सेस मंजुर करण्यात आल्या आहेत.

सद्य:स्थितीत विशेष नवजात काळजी कक्ष नाशिक येथे १ बाल रोग तज्ञ, ४ वैद्यकिय अधिकारी व ३८ स्टाफ नर्स मंजूर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालय (पुणे) येथील रुग्णालयास वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३७) * ३५२७३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालय (पुणे) येथे मागील गेल्या दोन वर्षापासून वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची कमतरता असल्याने बहुतांश रुग्णांना वैद्यकीय सेवा सुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत रुग्णालय प्रशासनाने वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करावी असा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रस्तावावर शासनाने निर्णय घेऊन रुग्णालयाला वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची एकूण मंजूर पदे ९५४ आहे. त्यापैकी ७२८ भरलेली व २२६ रिक्त पदे आहेत.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच गट-क व गट-ड ची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे पिराची कुरोली (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची दुरवस्था झाल्याबाबत

**(३८) * ३६५४२ श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पिराची कुरोली (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची दुरवस्था झाली असून विद्यार्थ्यांच्या जिवीताला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने शाळा पाडण्याचे निर्देश गटविकास अधिकारी पंचायत समिती यांनी माहे आक्टोंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शाळा इतर ठिकाणी भरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

मौजे पिराची कुरोली, ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथील जिल्हा परिषद शाळांच्या २ जून्या वर्ग खोल्या असून २ नवीन वर्ग खोल्या आहेत. शाळेतील सर्व विद्यार्थी नवीन २ वर्ग खोल्यात वर्ग भरविण्यात येत असून सदर शाळेतील विद्यार्थी पटसंख्या ७६ इतकी असून विद्यार्थ्यांना बसण्यासाठी पुरेशी आहेत. विद्यार्थी बसत असलेल्या ह्या दोन्ही वर्ग खोल्या धोकादायक नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लोहारा (जि.उस्मानाबाद) शहरातील ग्रामीण रुग्णालय सुरु करण्याबाबत

**(३९) * ३६६५३ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोहारा (जि.उस्मानाबाद) शहरातील हिमरगा रस्त्यालगत रुपये ४ कोटी ४४ लाख खर्च करुन बांधण्यात आलेल्या ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीचा वापर होत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रुग्णालयाचे काम पूर्ण झालेले असतांनाही रुग्णालय कार्यान्वित न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्रातच ग्रामीण रुग्णालय सुरु असून उपचारार्थ येणाऱ्या रुग्णांना जागा अपूरी पडत असल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार रुग्णालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

लोहारा ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीसाठी एकूण रुपये ६,२०,५१०००/- इतका खर्च झाला आहे.

(२), (३) व (४) लोहारा येथील ग्रामीण रुग्णालयातील पहिल्या टप्प्याच्या मुख्य इमारतीचे विद्युत, पाणीपुरवठा इत्यादी काम अपुर्ण असल्यामुळे इमारत ताब्यात घेण्यात आली नाही. दुसऱ्या टप्प्यातील इमारतीचा ताबा अद्याप सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेला नाही. सद्य:स्थितीत ग्रामीण रुग्णालय हे प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सुरु असून उपचारार्थ येणाऱ्या सर्व रुग्णांना योग्य प्रकारे रुग्णसेवा दिली जाते. त्यामुळे कोणत्याही रुग्णांची गैरसोय होत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ओबीसी, एसबीसी, वीजेएनटी, एससी आणि एसटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या स्थगित शिष्यवृत्या देण्याबाबत

**(४०) * ३५२१५ श्री.कपिल पाटील, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३२२०६ ला दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओबीसी, एसबीसी, वीजेएनटी, एससी आणि एसटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या स्थगित शिष्यवृत्या त्वरीत अदा करण्याबाबत छात्रभारतीने समाजकल्याण आयुक्तांकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील एससी, एसटी, एनटी तसेच ओबीसी आणि वीजेएनटीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप शासन नियमानुसार न करता जास्त विद्यार्थी दाखविण्यात येऊन त्यांच्या नावाने शिष्यवृत्तीत गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शिष्यवृत्ती देणे, शिष्यवृत्तीची प्रलंबित प्रकरणे ऑनलाईन करणे, प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती फॉर्म ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी आवश्यक सुविधा सर्व महाविद्यालयात उपलब्ध करुन देणे तसेच शिष्यवृत्तीत गैरव्यवहार करणाऱ्या दोषींविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) राज्यातील एससी, एसटी, एनटी तसेच ओबीसी आणि वीजेएनटीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या वाटपामधील गैरव्यवहारांच्या अनुषंगाने विशेष चौकशी पथकामार्फत चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीमध्ये रेकॉर्ड उपलब्ध न होणे, तदर्थ अनुदानाचे समायोजन न करणे, महाविद्यालयाच्या पी.एल.ए बँक खात्यामध्ये रक्कम पडून असणे या व इतर काही गंभीर अनियमितता दिसून आलेल्या आहेत.

सदर अहवालातील शिफारशींनुसार कार्यालयातील अभिलेख्यांची पडताळणी करुन गुन्हा नोंद करणे, अपहाराच्या रक्कमेची वसुली करणे व आवश्यकतेनुसार जबाबदारी निश्चित करण्याबाबत आदिवासी विकास विभागामार्फत व सामाजिक न्याय विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.

अशा प्रकारांना आळा बसण्याकरीता विद्यार्थ्यांकडुन ऑनलाईन शिष्यवृत्ती फॉर्म भरुन घेणे, शिष्यवृत्तीची रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यामध्ये ऑनलाईन जमा करणे याकरीता सन २०१७-१८ पासून माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत MAHADBT Portal विकसित करण्यात आले असून या वर्षापासून शिक्षण फी, परिक्षा फी, इतर तद्नुषंगिक फी व निर्वाह भत्त्याची रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्याचे धोरण आहे. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन भरण्यासाठी MAHADBT Portal उपलब्ध करुन देण्यात आले आहे. याबाबत सर्व महाविद्यालयांना नवीन MAHADBT Portal बाबत माहिती देण्यात आली आहे. तसेच याबाबत जनजागृती करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

छात्रभारतीने ओबीसी, एसबीसी, वीजेएनटी, एससी आणि एसटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या स्थगित शिष्यवृत्ती त्वरीत अदा करण्याबाबत सर्व प्रादेशिक उपायुक्त, सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील पदोन्नतीबाबत

**(४१) * ३४९०८ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा आरोग्य अधिकारी या पदासाठीची प्रक्रिया तीन महिन्यात पूर्ण करण्याचे आदेश दिनांक १३ जुलै, २०१६ रोजी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील सुमारे १४० पदे रिक्त असतानाही शासनाकडून पदोन्नतीची कार्यवाही केली जात नाही तसेच याबाबत पात्र असलेल्या अधिकारी व डॉक्टर यांनी दिनांक १७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणा प्रभावीपणे राबविण्यासाठी पात्रता पूर्ण केलेल्या अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिनांक १३/७/२०१६ रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील पदोन्नतीच्या रिक्त पदासाठी ३ महिन्यात विभागीय पदोन्नती समितीची बैठक आयोजित करण्याबाबत आदेशित केले आहेत. तसेच मा.न्यायाधिकरणात दाखल झालेल्या संकीर्ण

अर्जामध्ये मा.न्यायाधिकरणाने दिनांक ५/१०/२०१६ रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील उपलब्ध रिक्त पदे वर्षनिहाय पात्र अधिकाऱ्यांमधून भरण्याबाबत आदेशित केले आहे.

(२) जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने भरण्याची कार्यवाही करण्यात येते. तसेच पात्र अधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने कार्यवाही सुरु आहे.

(३) जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील पदोन्नती कोटयातील रिक्त पदे सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तथापि, मा.उच्च न्यायालय, मुंबई यानी याचिका क्र. २७९७/२०१५ प्रकरणी दिनांक ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये दिनांक २५/०५/२००४ चा शासन निर्णय रद्द करुन पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाविरुध्द शासनाच्यावतीने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका दाखल करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने सर्व स्तरावरील पदोन्नती प्रक्रिया स्थगित ठेवण्यात यावी तसेच पदोन्नतीसंदर्भात कोणतेही आदेश निर्गमित होणार नाहीत, याबाबत दक्षता घ्यावी. अशा सूचना दिनांक ०२/११/२०१७ च्या पत्रान्वये दिल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही स्थगित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४२) * ३५६०१ श्री.जयंत पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरोग्य विभागांतर्गत १२९०५ आरोग्य संस्था असून गट “अ” ते गट “ड” गटात एकूण १५१९५ पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात शासकीय रुग्णालयाच्या नवजात बालक कक्षात बालकांच्या प्रकृतीची काळजी घेण्यासाठी आवश्यक असणारे व्हेन्टीलेटर उपलब्ध नसून व्हेन्टीलेटरची यंत्रणा वापरण्यासाठी राज्यात तज्ञ डॉक्टर्स नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात १८१४ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत असून त्यातील ९३ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये स्वच्छता गृहे उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रुग्णांना पुर्ण क्षमतेने आरोग्य सेवा मिळणे, रिक्त पदे भरणे व आरोग्य केंद्रामध्ये स्वच्छता गृहे उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत SNCU Level-३ कार्यरत आहेत. वैद्यकीय शिक्षण खात्याच्या हॉस्पिटलमध्ये व्हेन्टीलेटर उपलब्ध असतात.

(३) हे अंशत: खरे आहे.

राज्यात सद्य:स्थितीत एकूण १८१४ प्राथमिक आरोग्य केंद्र जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत आहेत. यापैकी ४६ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीची बांधकामे सुरु असल्याने तेथे स्वच्छतागृहे बांधण्यात आलेली नाहीत.

(४) ज्या ४६ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीची बांधकामे जिल्हा परिषदेमार्फत सुरु आहेत. तसेच काही प्राथमिक आरोग्य केंद्रे अद्याप जागे अभावी तात्पुरत्या स्वरुपात उपकेंद्रामध्ये जिल्हा परिषद इमारतीत व काही ठिकाणी भाडे तत्वावरील इमारतीत कार्यरत आहेत. अशा ठिकाणी स्वच्छतागृहाची पर्यायी व्यवस्था करुन देण्यात आली आहे. तसेच आरोग्य

केंद्राची बांधकामे लवकरात लवकर पुर्ण करण्याच्या सूचना सर्व जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे रुपये ६६००) मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु असून महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ वैद्यकीय अधिकारी (ग्रेड पे रुपये ५४००) यांची रिक्त पदे भरण्यासाठी शासन निर्णय दिनांक २६/१०/२०१६ अन्वये जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीमार्फत नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मुलाखतीव्दारे भरण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांसाठी ४१२ व उर्वरित २२ जिल्ह्यांसाठी २८८ वैद्यकीय अधिकारी गट-अ ची रिक्त पदांची जाहिरात देण्यात आलेली होती. त्यानुसार एकूण ७०० पदांपैकी ३०६ पदे जिल्हास्तरावर भरण्यात आली असून उर्वरित ३९४ रिक्त पदे भरण्याबाबत तशी जाहिरात ०८ सप्टेंबर, २०१७ रोजी शासनस्तरावरुन देण्यात आली असून, त्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे. तसेच गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी माहे जानेवारी, २०१६ मध्ये जाहिरात देण्यात आली होती सदर भरती प्रक्रिया (कोल्हापूर परिमंडळ वगळून) पूर्ण करुन पदे भरण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नगरसूल (ता.येवला, जि.नाशिक) ग्रामीण रुग्णालयातील प्रलंबित कामांबाबत

**(४३) * ३४८८३ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगरसूल (ता.येवला, जि.नाशिक) ग्रामीण रुग्णालयातील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे शासनास पाठविण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने ग्रामीण रुग्णालय नगरसूल येथील कामांचे अंदाजपत्रके व आराखडे शासनास प्राप्त झाले आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

(३) सदर ग्रामीण रुग्णालयाचे कामाचे अंदाजपत्रक सादर करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास कळविले आहे व ते प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही जिल्हा शल्यचिकित्सक नाशिक यांचेकडून सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयातील आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४४) * ३५१५६ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागाने सन २०१३ मध्ये लोकसंख्येच्या आधारावर नागपूर जिल्हयातील आरोग्य उपकेंद्रात १०५ आरोग्य सेवक आणि ११४ आरोग्य सेविका पदांना मान्यता दिली असून १० वैद्यकीय अधिकारी, ३२ आरोग्य सेविका व इतर पदांना मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील रिक्त पदे न भरल्यामुळे रुग्णालयात येणाऱ्या आजारी रुग्णांना त्याचा त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.

शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी, २०१३ अन्वये नागपूर जिल्हयासाठी अतिरिक्त मनुष्यबळ निर्माण करण्यात आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर पदे अद्याप भरण्यात आलेली नाहीत. तथापि राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी स्वरुपातील अवैद्यकीय कर्मचाऱ्यांमार्फत आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांच्यामार्फत आरोग्य सेवक तसेच आरोग्य सेविकेची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ यांची रिक्त पदे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत व शासनस्तरावरुन भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्न रुग्णालयांमध्ये आगामी वर्षासाठी लागणारी औषधे व उपकरणांच्या खरेदीसाठी निधी नसल्याबाबत

**(४५) * ३५९७३ श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.रामहरी रुपनवर, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १६ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्न रुग्णालयांमध्ये आगामी वर्षासाठी लागणारी औषधे व उपकरणांच्या खरेदीसाठी निधी नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, औषधे व उपकरणे यांच्या खरेदीसाठी दरवर्षी १२७ कोटी रूपयांची मागणी वित्त विभागाकडे करण्यात येत असून प्रत्यक्षात हा खर्च जवळपास १८० कोटी रूपयांपर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त होत असल्याने गेली काही वर्ष औषध पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारांना वेळेवर त्यांची देणी दिली नव्हती, परिणामी यंदा वैद्यकीय शिक्षण विभागाला उपलब्ध झालेल्या निधीतून गेल्या

वर्षांची कंत्राटदारांची देणी देण्यात आल्यामुळे सन २०१७-१८ साठी औषधे व उपकरणाच्या खरेदीसाठी वैद्यकीय शिक्षण विभागाकडे निधीच शिल्लक राहिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे वैद्यकीय शिक्षण विभागाने आरोग्य विभागाकडे रुपये ४५० कोटी देण्यात यावे अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून सदर महाविद्यालये व रुग्णालयांना औषधे व उपकरणांसाठी आवश्यक निधी विनाविलंब उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यात स्वाईन फ्ल्यू व डेंग्यूच्या रोगाची लागण झाल्याबाबत

**(४६) * ३४९३८ श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शहरी भागासह ग्रामीण भागात दिनांक १ जानेवारी ते ४ ऑक्टोबर, २०१७ पर्यंत ९७८ रुग्णांना स्वाईन फ्ल्यूची लागण झाली असून ४६ रुग्णांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मा.पालकमंत्री यांनी जुलै महिन्यात स्वाईन फ्ल्यूचा प्रादुर्भाव वाढल्याने, तातडीने बैठक घेऊन सर्व स्थानिक स्वराज्य संस्था जिल्हा रुग्णालयाला जनजागृती व लस खरेदीचे आदेश दिले होते, तसेच ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयात स्वाईन फ्ल्यूची लसच उपलब्ध नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच ठाणे जिल्हयात मागील आठ महिन्यात ८८ रुग्णांना डेंग्यूची लागण झाली असून ८८ पैकी ५१ रुग्ण ऑगस्ट महिन्यात आढळून आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने स्वाईन फ्ल्यू व डेंग्यू या रोगांचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक १ जानेवारी ते ४ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत ठाणे जिल्हयात (शहरी भागासह) ९८७ जणांना स्वाईन फ्ल्यूची बाधा झाली तर त्यापैकी ५० जणांचा मृत्यू झाला.
(२) होय. हे खरे आहे.

दिनांक ५ जुलै, २०१७ रोजी मा.पालकमंत्र्यांनी ठाणे जिल्हा आणि परिसरातील भागाचा स्वाईन फ्ल्यू संदर्भात आढावा घेतला. ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालय ऑक्टोबर, २०१७ मध्ये इन्फ्ल्यूएंझा लस उपलब्ध नव्हती हे खरे आहे. तथापि दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ रोजी लस उपलब्ध झाली.
(३) हे अंशत: खरे आहे.

ठाणे जिल्हयात २०१७ मधील पहिल्या ८ महिन्यात डेंग्यूचे २९ रुग्ण आढळले असून त्यापैकी ४ रुग्ण ऑगस्ट महिन्यात आढळले आहेत.
(४) स्वाईन फ्ल्यू आणि डेंग्यू आजाराचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

१. साथरोगाचे नियमित सर्वेक्षण.
२. डेंग्यूसाठी किटकशास्त्रीय सर्वेक्षण.
३. ऑसेलटॅमिवीर तसेच इतर आवश्यक औषधांचा पुरेसा साठा.
४. स्वाईन फ्ल्यू उपचारासाठी स्क्रिनिंग सेंटर्स आणि आयसोलेशन वॉर्डसची स्थापना.
५. डेंग्यू उपचारासाठी डॉक्टरचे प्रशिक्षण.
६. निदानासाठी प्रयोगशालेय सुविधा.
७. डास नियंत्रणासाठी एकात्मिक किटक व्यवस्थापन.

८. इनफ्ल्यूएंझा साठी अतिजोखमीच्या व्यक्तींना मोफत व ऐच्छिक लसीकरण.

९. आंतरविभागीय समन्वय.

१०. लोकसहभाग

११. आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत नियमित ताप सर्वेक्षण

१२. साथरोग उद्रेकाच्या प्रभावी व्यवस्थपनासाठी जिल्हा पातळीवर शीघ्र प्रतिसाद पथके कार्यरत.

१३. राज्यात डेंग्यू विषाणूजन्य तापाच्या निदानासाठी सामान्य रुग्णालय ठाणे येथे सेटीनल सेंटरची स्थापना.

१४. नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षण

१५. १६ मे, २०१७ हा दिवस राष्ट्रीय डेंग्यू दिवस म्हणून विविध उपक्रमाद्वारे साजरा केला.

१६. दरवर्षी जुलै महिना डेंगी विरोधी महिना म्हणून साजरा केला जातो.

१७. शालेय डेंग्यू जागृती मोहिम.

१८. साथरोग नियंत्रणासाठी विविध माध्यमाद्वारे आरोग्य शिक्षण.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ग्रामीण भागातील रुग्णांना राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा लाभ मिळण्याबाबत

**(४७) * ३५०४३ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ३१२७१ ला दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारिद्रय रेषेखालील नागरिकांना वैदयकीय सेवेचा लाभ घेता यावा या उद्देशाने सुरु करण्यात आलेली राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना शहर व मध्यमवर्गीयांपूरतीच मर्यादित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, जालना, नंदुरबार, उस्मानाबाद, रत्नागिरी, सातारा, सिंधुदुर्ग आणि वाशिम या जिल्हयांमध्ये एकूण ८९४ अंगीकृत रूग्णालयांपैकी फक्त ६३ रूग्णालये अंगीकृत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ ग्रामीण भागातील रुग्णांना मिळण्यासाठी सदर योजना गाव, खेडी येथे पूर्णक्षमतेने राबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतील मूळ तरतूदी कायम ठेवून सदर योजना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना या नावाने राबविण्यात येत आहे. सदर योजना केवळ शहर व मध्यम वर्गीयांपूरतीच मर्यादित नसून योजनेमध्ये अंत्योदय, अन्नपुर्णा, पिवळे व केशरी शिधापत्रिकाधारक कुटूंबे तसेच १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यामधील शुभ्र शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंबे, अशाप्रकारे ग्रामीण व शहरी भागातील एकूण २ कोटी २३ लाख लाभार्थी कुटूंबे समाविष्ट आहेत.
(२) या योजनेंतर्गत एकूण ४९२ अंगीकृत रुग्णालयांपैकी बीड, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, जालना, नंदुरबार, उस्मानाबाद, रत्नागिरी, सातारा, सिंधुदुर्ग आणि वाशिम या जिल्ह्यामध्ये ६३ रुग्णालये अंगीकृत करण्यात आली आहेत. विमा कंपनी आणि राज्य आरोग्य हमी सोसायटीमधील करारनाम्यातील तरतूदीनुसार रुग्णालये अंगीकृत करण्याची कमाल मर्यादा आहे.
(३) सदर योजनेचा लाभ ग्रामीण भागातील रुग्णांना मिळण्यासाठी योजना गाव, खेडी येथे पूर्ण क्षमतेने राबविण्याच्या उद्देशाने आतापर्यंत अंगीकृत रुग्णालयांनी ११०४६ आरोग्य शिबीरे घेतली असून जळगाव, नंदुरबार, बीड, नाशिक, अकोला, सांगली व मुंबई (घाटकोपर) येथे महाआरोग्य शिबीरे घेतली आहेत. योजनेंतर्गत आतापर्यंत १५,५०,१५५ शस्त्रक्रिया झाल्या आहेत. रेडीओ, दुरदर्शन, वर्तमानपत्रे, रेल्वे व एसटी बस या माध्यमातून योजनेची प्रचार व प्रसिध्दी करण्यात येत आहे.
(४) विद्यमान महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेची व्याप्ती वाढवून सुधारीत योजना राबविण्याबाबत प्रशासकीय कार्यवाही प्रगतीत आहे.

-----------------

## राज्यातील शासकीय आरोग्य संस्थांच्या बांधकामांना गती देण्याबाबत

**(४८) * ३४७४७ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय आरोग्य संस्थांच्या बांधकामांना गती देण्यासाठी तसेच १८४ आरोग्य रुग्णालयांचे बांधकाम वेळेत पूर्ण होण्यासाठी कालबध्द कार्यक्रम सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या १८४ नवीन रुग्णालयांमध्ये किती ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा सामान्य ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन, ट्रामा केअर सेंटर, महिला व नवजात शिशू रुग्णालय, तसेच ५० आणि १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयांचे काम हाती घेण्यात येणार आहे,

(३) असल्यास, सदर रुग्णालये राज्यातील कोणत्या जिल्हयात कार्यरत होणार आहेत आणि यासाठी साधारण किती कालावधी अपेक्षित आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नव्याने स्थापन केलेल्या १८४ रुग्णालयापैकी ७ रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. ४१ रुग्णालयाचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरीत १३६ रुग्णालयापैकी ४१ चे अंदाज आराखडे तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. १६ प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही सुरु आहे. ३२ ठिकाणी निविदा प्रक्रिया सुरु आहे व ४१ ठिकाणी जागा प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) शासन निर्णय दिनांक १७/०१/२०१३ व दिनांक ०९/०६/२०१४ अन्वये राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे जिल्हे वगळता उर्वरीत सर्व जिल्हयात नविन उपकेंद्रे/ प्राथमिक आरोग्य केंद्रे/ ग्रामीण रुग्णालये/ ट्रामा केअर युनिट/ स्त्री रुग्णालये/ उपजिल्हा रुग्णालये, मंजूर करण्यात आली आहेत. सदर रुग्णालयांचे बांधकाम पूर्ण करण्याची कार्यवाही जागेच्या व निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यात येत आहे.

-----------------

## नंदुरबार जिल्हा रुग्णालय येथे महिलेस उपचार मिळत नसल्याबाबत

**(४९) * ३६०६० श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्हा रुग्णालय येथे श्रीमती रविता वळवी या महिलेस एक महिना उपचार मिळाला नाही तसेच यांच्या मणक्यास त्रास झाल्याने त्यांना तातडीने १०८ क्रमांकाच्या रुग्ण वाहिकेने मुंबईत स्थलांतरीत करणे आवश्यक असताना रुग्णालयाने स्थलांतरीत केले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नंदुरबार रुग्णालयात एम.आर.आय. मशीन व इतर यंत्रणा उपलब्ध नसल्याने रुग्णांचे हाल होत असून उक्त सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) जिल्हा रुग्णालय नंदुरबार येथे निकषानुसार एम.आर.आय. मशिन अनुज्ञेय नाही. तथापि अशा स्वरुपाचे रुग्ण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे येथील रुग्णालयास संदर्भित करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैद्यकीय क्षेत्रातील कट प्रॅक्टीसमुळे सर्वसामान्य रुग्णांचे नुकसान होत असल्याबाबत

**(५०) * ३४८०५ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रुग्णांवर डॉक्टरांकडून उपचार करताना कट प्रॅक्टीसमुळे सर्वसामान्य जनतेची पिळवणूक होत असून जवळपास ४० टक्के कमिशन घेतल्याने रुग्णांचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कट प्रॅक्टीसमुळे सर्वसामान्य जनतेची होणारी लूट थांबावी व योग्य तेच उपचार व्हावेत तसेच दोषींना शिक्षा व्हावी यासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये संचालनालयांतर्गत शासनाने समिती स्थापन केलेली असून याबाबत कायदा, उपाययोजना करता येतील काय याचा अभ्यास करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीने कोणते अभिप्राय दिलेले आहेत व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) सदर समितीचा अहवाल प्राप्त झाला असून, तो तपासण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यातील अंगणवाडी सेविकांनी केलेल्या संपामुळे अंगणवाडीतील बालकांचा पोषण आहार बंद झाल्याबाबत

**(५१) * ३५९२८ आर्कि.अनंत गाडगीळ, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंगणवाडी सेविकांच्या संपाच्या १४ व्या दिवशी किमान ७३ लाख बालकांना पोषण आहार मिळालेला नसल्याचे दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे आरोग्य विभागाच्या पोषण पुनर्वसन केंद्रात १ हजार ७०३ अतिकुपोषित बालकांना दाखल करण्यात आले तसेच महिला व बालविकास विभागाच्या माहे जुलै, २०१७ च्या आकडेवारीनुसार ४ लाख ९२ हजार ७८० तीव्र कमी वजनाची बालके असून किमान ७६ हजार ८० बालके

अती तीव्र कमी वजनाची असून संपकाळात ४९ बालकांचे मृत्यू झाले तसेच कुपोषित बालकांच्या संख्येत वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंगणवाडी सेविकांच्या मानधनात वाढ करण्याकरिता शासन तयार नसून घरपोच आहारावर केंद्र शासनाचा जीएसटी लागू झाल्यामुळे समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना दिनांक १/१०/२०१७ पासून खालीलप्रमाणे मानधनवाढ करणेबाबतची बाब विचाराधीन आहे.

अंगणवाडी सेविका ५०००/- + १५००/- = ६५००/-

अंगणवाडी मदतनीस २५००/- + १०००/- = ३५००/-

मिनी अंगणवाडी सेविका ३२५०/- + १२५०/- = ४५००/-

त्याचप्रमाणे भाऊबीज भेट रुपये १०००/- वरुन रुपये २०००/- करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच दिनांक १/०४/२०१८ पासून एकदाच ५% वेतनवाढ देण्यात येणार आहे.

-----------------

## विजाभज, इमाव व विमाप्र या विभागाच्या आश्रमशाळांना आर.टी.ई. अधिनियम, २००९ लागू करणेबाबत

**(५२) * ३५६१३ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे : दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक २२५२३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व व्यवस्थापनाच्या शाळांना आर.टी.ई. अधिनियम, २००९ लागू करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विजाभज, इमाव व विमाप्र या विभागामार्फत राज्यात सुमारे ५४६ प्राथमिक आश्रमशाळा, २९६ माध्यमिक आश्रमशाळा व १४८ उच्च माध्यमिक आश्रमशाळा चालविण्यात येत असून या आश्रमशाळांना आर.टी.ई. अधिनियम, २००९ लागू करण्यात आला आहे काय,

(३) नसल्यास, याबाबत तसेच आर.टी.ई. अधिनियमानुसार संच मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.

(२) होय, अंशत: खरे आहे.

(३) सद्य:स्थितीत आश्रमशाळांची संच मान्यता शासनाच्या दिनांक ०८/१०/१९९१ च्या शासन निर्णयानुसार देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तथापि, आरटीई नुसार संच मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## राज्यातील दमणगंगा-पिंजाळ तसेच पार-तापी-नर्मदा नदीजोड प्रकल्पाबाबत

**(५३) * ३४७०८ श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दमणगंगा-पिंजाळ तसेच पार-तापी-नर्मदा नदीजोड प्रकल्प राज्य शासन व केंद्र शासनाच्या सहकार्याने हाती घेण्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निश्चित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे, तसेच या प्रकल्पाला किती खर्च येणार असून प्रकल्पाचे काम केव्हापासून सुरु करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, या प्रकल्पामुळे राज्यातील कोणकोणत्या भागांना सिंचनाचा फायदा होणार आहे तसेच किती सिंचन क्षमता वाढणार आहे ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) दिनांक ३ मे, २०१० रोजी तत्कालीन मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, गुजरात व केंद्रीय जलसंसाधन मंत्री यांच्यामध्ये दमणगंगा-पिंजाळ व पार-तापी-नर्मदा या गुजरात व महाराष्ट्र राज्यातील आंतरराज्य नदीजोड योजनांच्या संदर्भात सामंजस्य करार झालेला आहे.
(२) दमणगंगा-पिंजाळ योजनेव्दारे दमणगंगा खोऱ्यातील महाराष्ट्राच्या हद्दीतील महाराष्ट्राच्या वाटयाचे पाणी मुंबई शहराच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी वळविणे हा मुख्य उद्येश आहे. राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने तयार केलेल्या या योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार प्रकल्पाची किंमत रू. २७४६.६१ कोटी इतकी आहे. सदर अहवाल शासन स्तरावर विचाराधीन आहे.

पार-तापी-नर्मदा योजनेत एकूण ६ धरणे प्रस्तावित असून या धरणांव्दारे उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा गुजरात राज्यातील सौराष्ट्र व कच्छ भागात सिंचनासाठी व पिण्यासाठी करण्याचे नियोजन आहे. या योजनेची किंमत रू. १०२२१ कोटी आहे.

वरील प्रकल्पांबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.
(३) दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्प हा प्रकल्प मुंबई शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी तसेच पार-तापी-नर्मदा नदीजोड प्रकल्प हे नवसारी, सुरत, दांग, भरूच, सौराष्ट्र व कच्छ भागातील सिंचन व पिण्याच्या पाण्यासाठी नियोजित आहे.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयात रामकृष्ण गोदावरी उपसा जलसिंचन योजना सुरु करणेबाबत

**(५४) * ३५३८१ श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ३२१७२ ला दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील रामकृष्ण गोदावरी उपसा जलसिंचन योजना शासनाने ताब्यात घेऊन सुरु करणेसाठी निर्णय घेणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, २० वर्षापासुन बंद असलेली योजना पुर्ववत सुरु झाल्यास १८ गावातील सिंचन क्षेत्रासह ५० गावातील पिण्याच्या पाण्याची सोय होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक ३ मे, २०१६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार संबंधित विभागाने प्रस्ताव शासनाकडे दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजना सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) नाही.
(२) रामकृष्ण गोदावरी उपसा जलसिंचन योजना सन १९९६ पासून बंद असून सदर योजना सिंचनाची योजना असल्याने पाणी पुरवठ्याची तरतूद नाही.
(३) योजना पुन:कार्यान्वित करण्यासाठी अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाकडून शासनास प्राप्त झाला आहे.
(४) सदर प्रकरणी धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत प्रस्ताव विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्हयातील बाई गंगाबाई रुग्णालयाच्या दुर्लक्षामुळे सिकलसेलग्रस्त मुलीचा मृत्यू झाल्याबाबत

**(५५) * ३५९१४ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्हयातील बाई गंगाबाई रुग्णालयाच्या दुर्लक्षामुळे दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ रोजी सिकलसेलग्रस्त एका मुलीचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.

(२) याबाबत करण्यात आलेल्या चौकशीमध्ये रुग्णाचा मृत्यू सिकलसेल या रोगाने झाला असल्याचे आढळून आले आहे. तद्पूर्वी रुग्णांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कर्तव्यावर गैरहजर असणाऱ्या, सहायक प्राध्यापकास दिनांक ०१/११/२०१७ च्या आदेशान्वये निलंबित केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर विभागात स्वाईन फ्ल्यू व डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत

**(५६) * ३५४६६ श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागात मोठया प्रमाणात स्वाईन फ्ल्यू व डेंग्यूची अनेकांना लागण झाली असून स्वाईन फ्लू या आजाराने २ दिवसात ५ महिला व २ पुरूषांचा मृत्यू झाल्याचे दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने स्वाईन फ्ल्यू व डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

नागपूर विभागात सन २०१७ मध्ये दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ पर्यंत स्वाईन फ्ल्यूचे ३५९ रुग्ण आढळले असून त्यापैकी ७३ जणांचा मृत्यू झाला आहे.

२० व २१ सप्टेंबर या दोन दिवसांत २ स्त्रिया आणि १ पुरुष असा तीन जणांचा मृत्यू या आजाराने झाला.

सप्टेंबर, २०१७ पर्यंत नागपूर विभागात डेंग्यूचे १०३ रुग्ण आढळले आहेत.

(२) होय.

विभागातील साथरोग परिस्थितीचा नियमित आढावा घेण्यात येतो. स्वाईन फ्ल्यू आणि डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात आल्या.

१. नियमित साथरोग सर्वेक्षण
२. डेंग्यूसाठी किटकशास्त्रीय सर्वेक्षण
३. आवश्यक औषधांचा पुरेसा पुरवठा
४. निदानासाठी प्रयोगशालेय सुविधा
५. इन्फ्ल्यूएंझा साठी अतिजोखमीच्या व्यक्तींना लसीकरण
६. डासोत्त्पत्ती रोखण्यासाठी एकात्मिक किटक व्यवस्थापन
७. आंतरविभागीय समन्वय
८. लोकसहभाग
९. साथरोग नियंत्रणासाठी आरोग्य शिक्षण

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) मध्ये कुपोषित बालकांची नोंद नसल्याबाबत

**(५७) * ३५३३२ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) मध्ये कुपोषित बालकांची नोंद नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कुपोषित बालकांची नोंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील जिल्हा परिषद व बांधकाम विभागाने डावललेल्या वित्तीय मर्यादेबाबत

**(५८) * ३५४६३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ३३८३२ ला दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय निवासस्थान, दालन यांच्या किरकोळ दुरूस्तीसाठी सुमारे ३१ लाख रूपयांचा अवाढव्य खर्च करून वित्तीय मर्यादा डावलणे, वरिष्ठ कार्यालयाची पुर्व परवानगी न घेणे व इतर नियमभंग केल्यावरून परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जून-जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी तक्रार नोंदविली होती, हे खरे आहे काय,
(२) तसेच, शासनाने विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद येथील अप्पर आयुक्त व उपायुक्त (अस्थापना) यांची दिनांक २१ जुलै, २०१७ रोजी चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने दोषींविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्यास्तरावरुन प्राथमिक चौकशी करण्यात आलेली आहे. प्राथमिक चौकशी अहवालातील निष्कर्ष विचारात घेऊन याबाबत जबाबदार असलेले संबंधित कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडून खुलासा मागविण्यात आलेला आहे. खुलासा प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मलवाडा (ता.विक्रमगड, जि.पालघर) ग्रामपंचायतीमध्ये रोजगार हमी योजनेंतर्गत सुरु असलेल्या कामांच्या निधीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५९) * ३६२४२ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलवाडा (ता.विक्रमगड, जि.पालघर) ग्रामपंचायतीमध्ये रोजगार हमी योजनेंतर्गत सुरु असलेल्या सन २०१३ ते २०१६ या कालावधीतील निधी मृत व्यक्तींच्या नावे दाखविल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील गावकऱ्यांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर आंदोलन व उपोषण केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) सन २०१५-२०१६ या वर्षात मलवाडा गावठाण ते स्मशानभूमी व दिवेपाडा ते हरणोली पाडा या दोन रस्त्याचे कामे हाती घेण्यात आले होते. या कामावरील मजूरांची मजूरी मिळत नसल्याबाबतची तक्रार निवेदनाद्वारे निदर्शनास आणली होती. याबाबत चौकशी केली असता एका कामावरील ११ पैकी ७ मजूरांची मजूरी खात्यावर जमा झाली आहे. परंतु ४ मजुरांची मजुरी तांत्रिक कारणामुळे जमा झालेली नाही. ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## मुखेड (जि.नांदेड) तालुक्यात अंगणवाडयांना स्वत:ची इमारत नसल्याबाबत

**(६०) * ३५५७७ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यात २६९ अंगणवाड्यांना स्वत:ची इमारत नसल्याने बालकांच्या शिक्षणाची तसेच आरोग्याची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे इमारत असलेल्या अंगणवाड्यांना रंगरंगोटी नाही, अस्वच्छ परिसर, दुर्गंधी यामुळे इमारतीची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अंगणवाड्यांचा आढावा घेऊन स्वत:ची इमारत नसलेल्या अंगणवाड्यांच्या इमारती उभारणे तसेच इमारत असलेल्या अंगणवाड्यांची दुरवस्था दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) शासनाने अंगणवाडी इमारत बांधकामाबाबतचा आढावा घेऊन महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र या योजनेंतर्गत नवीन अंगणवाडी बांधकामे घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत जिल्हयातील एकूण ४८८ अंगणवाडी केंद्र बांधकामासाठी स्वत:ची जागा उपलब्ध झाली असून त्याकरिता मनरेगा अंतर्गत अंगणवाडी केंद्र इमारत मिळणेबाबतची प्रक्रिया सुरु असून यामध्ये मुखेड प्रकल्पातील २३ अंगणवाडी केंद्राचा समावेश आहे. तसेच जिल्हा नियोजन व विकास परिषद अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून अंगणवाडी दुरुस्तीचे काम घेण्याबाबत प्रावधान करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयात लावलेल्या वृक्षांचे संवर्धन करण्याबाबत

**(६१) * ३५०४० श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात माहे जुलै, २०१७ वा त्यादरम्यान लावलेल्या वृक्षांची संवर्धनाची सोय नसल्याने रोपटे कोमेजली आहे तसेच वन विभागातर्फे राबविण्यात आलेल्या ५० कोटी वृक्ष लागवड योजनेत लावण्यात आलेल्या ३९ लाख रोपट्यांची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच जिल्हयाला माहे जुलै, २०१७ मध्ये २५ लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट असताना वन विभागाने २७ लाख झाडांची लागवड केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने झाडांच्या संवर्धनासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२) यवतमाळ जिल्हयाला सन २०१७ च्या पावसाळयात ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत एकूण २३.७९ लक्ष इतके उद्दिष्ट देण्यात आले होते. सदर उद्दिष्टांच्या अनुषंगाने वन विभाग व इतर यंत्रणांकडून एकूण २९.३० लक्ष वृक्षांची लागवड करण्यात आलेली आहे.
(३) वृक्ष लागवड केलेल्या एकूण २९.३० लक्ष रोपांपैकी दिनांक ३१/१०/२०१७ अखेर जिवंत रोपांची टक्केवारी सरासरी ९२.३६ टक्के आहे. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिल्हापरिषदेकडील तांत्रिक सेवेतील बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांचे गट “अ” मध्ये समायोजन करणेबाबत

**(६२) * ३५०२५ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, अ‍ॅड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषदेकडील तांत्रिक सेवेतील बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांचे गट “अ” मध्ये समायोजन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने परिपत्रक काढून सर्व संबंधितांना याप्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वैद्यकीय अधिकाऱ्यांना गट “अ” मधील अधिकाऱ्यांची वेतनश्रेणी लागू केली असली तरी अद्याप समायोजन संदर्भातील परिपत्रक काढले गेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## करमाळा (जि.सोलापूर) तालुका पंचायत समितीच्या आवारात सांडपाणी साठल्यामुळे डासांची निर्मिती होऊन साथीचे आजार होत असल्याबाबत

**(६३) * ३५४९७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुका पंचायत समितीच्या आवारात पाणी साठल्याने लघु पाटबंधारे स्थानिकस्तर विभागाच्या कार्यालयासमोर तळयाचे स्वरुप आले असल्याचे माहे सप्टेबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तालुक्याच्या पश्चिम भागात पावसाने प्रत्येक गावात रस्त्यावर व अन्यठिकाणी सांडपाणी व पावसाचे पाणी साचून डबकी तयार झाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे येथे साचलेल्या पाण्यात डासांची निर्मिती होवून साथीचे आजार पसरण्याची भिती व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, येथील ग्रामस्थांना साथीचे आजार होवू नये यासाठी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) पावसामुळे साचलेल्या पाण्यात डासांची निर्मिती होऊ नये म्हणून डबकी रिकामी करण्याबाबत ग्रामपंचायतीमार्फत उपाययोजना करण्यात आल्या आहेत व साथीचे आजार होऊ नये म्हणून ग्रामपंचायतीमार्फत पिण्याच्या पाण्यामध्ये TCL पावडर, तुरटीचा वापर नियमित करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोणार सरोवराच्या विकासाची सद्य:स्थिती मांडणारा अहवाल सादर करण्याबाबत

**(६४) * ३५६०३ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार सरोवराच्या विकासाची सद्य:स्थिती मांडणारा अहवाल बुलढाणा जिल्हाधिकाऱ्यांनी सादर करण्याबाबतचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवाल जिल्हाधिकाऱ्यांनी सादर केला आहे काय व त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) होय.

(२) व (३) होय. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार लोणार सरोवर क्षती प्रतिबंधक व संवर्धन समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीची दिनांक २६/८/२०१७ रोजी बैठक झाली. या बैठकीत लोणार सरोवराच्या क्षती प्रतिबंध संवर्धनाबाबत आढावा घेण्यात आला असून सर्व संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्यात येऊन काटेकोरपणे अंमलबजावणीच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याबाबतचा अहवाल (इतिवृत्त व प्रतिज्ञापत्र) मा.उच्च न्यायालयास सादर करण्यात आला असून प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## मौजे वाकण, खांबेश्वरवाडी-रोहिदासवाडी (ता.पोलादपूर, जि.रायगड) वाडीजोड रस्त्याबाबत

**(६५) * ३५२९४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, ॲड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक ३०३५० ला दिनांक २४ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाकण, खांबेश्वरवाडी-रोहिदासवाडी (ता.पोलादपूर, जि.रायगड) या ९०० मीटर लांबीच्या वाडीजोड रस्त्याचे रुंदीकरणासह-मजबुतीकरण-डांबरीकरण करण्यासाठी ग्रामस्थांनी मा.ग्रामविकास मंत्री, जिल्हाधिकारी, रायगड यांना माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदने देऊनही सदर रस्त्याचे काम अद्यापपर्यंत हाती घेण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामासाठी माहे ऑक्टोबर, २०१७ अखेर किती रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला व त्यापैकी किती निधी आतापर्यंत खर्च करण्यात आला आहे,

(३) तसेच रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) मौजे वाकण खांबेश्वरवाडी हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.८३ असून सदर रस्त्याच्या ६०० मीटर लांबीच्या डांबरीकरणासाठी रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत रुपये १०.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून रुपये १०.०० लक्ष माहे एप्रिल, २०१७ मध्ये खर्च करण्यात आला आहे.

(३) उर्वरीत खांबेश्वरवाडी ते रोहिदासवाडी हा ३०० मीटरचा रस्ता योजनाबाहय असल्याने ३०५४ रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत घेता येत नाही. त्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी सदर काम स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित करणे आवश्यक आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन राष्ट्रीयकृत बँकामार्फत न करता जिल्हा सहकारी बँकेमार्फत करण्याबाबत

**(६६) * ३५०१५ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय/निमशासकीय कर्मचारी/अनुदानित शाळा, कॉलेजमधील शिक्षक यांचे वेतन राष्ट्रीयकृत बँकामार्फत न करता जिल्हा सहकारी बँकामधून करण्याबाबत निर्णय वित्त विभागाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचारी आणि शिक्षक यांची राष्ट्रीयकृत बँकेतून वेतन करण्याची मागणी असताना सक्तीने त्यांची खाती जिल्हा किंवा सहकारी बँकेत उघडण्याबाबत वित्त विभागाचे आदेश काय आहेत,

(३) असल्यास, नागपूर आणि मुंबई या विभागातील सर्व शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन आर्थिकदृष्टया अडचणीत असलेल्या जिल्हा बँकांमध्ये वळवण्याबाबत वित्त विभागाचे काय धोरण आहे ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) नाही.

(२) कोणतेही आदेश नाहीत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## येवला (जि.नाशिक) वनपरिक्षेत्रातील कामांना प्रशासकीय मान्यता देवून ममदापूर संवर्धन राखीव क्षेत्रास वन पर्यटनाचा दर्जा देण्याबाबत

**(६७) * ३४६९३ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) वनपरिक्षेत्रातील वन्यजीव संवर्धन व संरक्षणासाठी प्रस्तावित व्यवस्थापन आराखड्यातील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत तसेच ममदापूर (ता.येवला, जि.नाशिक) संवर्धन राखीव क्षेत्रास वनपर्यटनाचा दर्जा देऊन या ठिकाणी वनउद्यान/ जैवविविधता उद्यान, रिसोर्ट तसेच बांबू शास्रीय रोप निर्मिती प्रकल्प इ. सुरु करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १० एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) ममदापूर संवर्धन राखीव क्षेत्रात पर्यटनास चालना देण्याच्या अनुषंगाने निसर्ग पर्यटन धोरणाशी सुसंगत असलेले योग्य ते उपक्रम जसे की निसर्ग पर्यटन केंद्र, उपहारगृह, डॉमिटरी, निरिक्षण मनोरे, सायकल ट्रॅक, साहसी खेळ इत्यादी राबविण्यात येत आहे.

जैवविविधता उद्यान तयार करुन त्याचे संगोपन व देखभाल करण्यासाठी मुबलक प्रमाणात पाणीसाठा आवश्यक आहे. तसेच बांबू रोपवनासाठी जास्त पर्जन्यवृष्टी व मातीची चांगली खोली आवश्यक आहे. ममदापूर-राजापूर, ता.येवला हा कमी पर्जन्यवृष्टीचा प्रदेश असून सदरचे वनक्षत्रात मातीची खोली अत्यल्प असल्यामुळे ममदापूर-राजापूर, ता.येवला येथील वनक्षेत्रात जैवविविधता उद्यान तयार करणे व बांबूची लागवड करणे शास्त्रीयदृष्ट्या योग्य होणार नाही.

-----------------

## गलांडवाडी (ता.दौंड, जि.पुणे) येथे तरुणीचा गर्भपात केल्याबाबत

**(६८) * ३४९७५ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गलांडवाडी (ता.दौंड, जि.पुणे) येथे आंतरजातीय विवाह केल्याच्या रागातून विवाहीत तरुणीच्या पालकांनी जबरदस्तीने सातारा येथील तरड गावाच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान गर्भपात करुन घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी पिडीत तरुणीच्या नवऱ्याने जिल्हा आरोग्य अधिकारी, पुणे तसेच आरोग्य कुटुंबकल्याण विभागाकडे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

पोटात दुखत असल्याने उपचारासाठी दिनांक १२ जून, २०१७ रोजी विवाहित तरुणी प्राथमिक आरोग्य केंद्र तरडगांव, ता.फलटण येथे तीच्या आईसोबत दाखल झाली होती. दिनांक १३ जून, २०१७ रोजी विवाहित तरुणीचा त्रास अधिक वाढल्याने तिचा नैसर्गिक गर्भपात झाला.

(२) होय हे खरे आहे.

पिडित तरुणीच्या पतीने जिल्हा शल्य चिकित्सक, सातारा यांचेकडे दिनांक ३ ऑगस्ट, २०१७ रोजी व अतिरिक्त संचालक कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांचेकडे दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजी लेखी तक्रार केली आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक, सातारा यांचेकडे केलेल्या तक्रारीमध्ये त्यांच्या पत्नीचा प्रा.आ.केंद्र, तरडगांव येथे बेकायदेशीर गर्भपात केला आहे याबाबत चौकशी करण्याची मागणी केली आहे.

तर अतिरिक्त संचालक कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांचेकडे केलेल्या तक्रारीमध्ये प्रा.आ.केंद्र, तरडगांव येथे नियमितपणे गर्भपात केले जातात व याची खोटी माहिती रजिस्टरला नोंद केली जाते. याबाबतची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

(३) प्रसुत प्रकरणी चौकशी केली असून चौकशीमध्ये रुग्णाचा गर्भपात बेकायदेशीर करण्यात आला नसून तो नैसर्गिक झाल्याचे दिसून आले. तथापि प्रा.आ.केंद्र, तरडगांव या केंद्रात एम.टी.पी. कायद्यानुसार गर्भपात केलेल्या लाभार्थींच्या नोंदी व अहवालामध्ये त्रुटी असल्याचे आढळून आल्याने डॉ.अनिल कदम, वैद्यकीय अधिकारी यांना दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी नोटीस बजावून खुलासा मागविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: वर्धा येथे शासनाकडून देण्यात येत असलेला पोषण आहार निकृष्ट दर्जाचा असल्याबाबत

**(६९) * ३५९६७ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा शहरालगतच्या पिंपरी (मेघे) भागातील अंगणवाडी केंद्रातून गर्भवती महिलेला देण्यात आलेल्या शिऱ्याच्या पाकीटात अळ्या सापडल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात गर्भवती व स्तनदा मातांकरीता शासनाकडून देण्यात येत असलेल्या हवाबंद पाकीटातील पोषण आहार अतिशय निकृष्ट दर्जाचा असल्याचा माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हवाबंद पाकीटातून कोटयवधी रुपये खर्च करुन पुरविण्यात येणारा पोषण आहार निकृष्ट दर्जाचा असून त्यामध्ये गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच गर्भवती व स्तनदा मातांकरीता चांगल्या प्रतीचा पोषण आहार देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) THR आहाराचा पुरवठा करताना पॅकेट फुटलेले नाही याबाबत खात्री करणेबाबत तसेच गोडावून मध्ये अथवा वाहतूक करताना पावसाने पॅकेट ओले होणार नाही याबाबत दक्षता घेण्याबाबतच्या सूचना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक), जिल्हा परिषद वर्धा यांनी पुरवठादार संस्था मे.रेणुका माता महिला बचतगट, कन्नड, औरंगाबाद यांना दिल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील व्यापाऱ्यांनी कोटयावधींचा महसूल कर बुडविल्याबाबत

**(७०) * ३५६४६ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या विक्रीकर विभागाच्या कामांबाबत महालेखापालांनी अनेक प्रकरणात नाराजी व्यक्त केली आहे, तसेच राज्यातील व्यापाऱ्यांनी १२ हजार ३३४ कोटी रुपयांचा महसूल विक्री कर बुडविल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील तीन वर्षात व्यापाऱ्यांकडील कर वसूलीसाठी विक्रीकर विभागाकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याचे कॅगने ताशेरे ओढले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने विशेष मोहिम राबवून करबुडविणाऱ्या व्यापाऱ्यांचा शोध घेवून त्यांच्याकडून करवसूलीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही. महालेखापालांनी विक्रीकर विभागांर्तगत महसूलाच्या थकबाकीची वसुली करण्यासाठी राज्यात मजबूत व प्रभावी कार्यतंत्र निर्माण करण्याची गरज आहे अशी शिफारस केली आहे. लापता झालेल्या व्यापाऱ्यांच्याकडून प्रलंबित असलेली वसूली ३१ मार्च २०१४,

३१ मार्च २०१५ व ३१ मार्च २०१६ रोजी अनुक्रमे रुपये ४५००.७५ कोटी, रुपये ४९७४.२५ कोटी व रुपये २८६०.१६ कोटी होती. मागील प्रलंबीत असलेली वसूली पुढील वर्षामध्ये परिगणीत होत असल्याने लापता व्यापाऱ्यांकडून विक्रीकर विभागाकडे प्रलंबित असलेली वसूली रुपये २८६०.१८ कोटी आहे.

(२) हे खरे नाही. भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांच्या ३१ मार्च, २०१६ ला संपलेल्या वर्षाच्या महसूली क्षेत्रावरील अहवालामध्ये लापता व्यापाऱ्यांनी वसूली करण्यासाठी करावयाच्या पाठपुराव्याच्या कार्यपद्धती विषद करणाऱ्या सूचना विक्रीकर विभागाने एप्रिल, २०१४ मध्ये जारी केल्याचा उल्लेख केला आहे.

(३) बेपत्ता व्यापाऱ्यांकडे प्रलंबित असलेली थकबाकी वसूल करण्याकरीता आयकर विभागाकडून व्यापाऱ्यांचे अद्यावत बँकखाते तसेच इतर तपशील मिळवणे याचबरोबर पोलीस स्टेशन, पोस्ट ऑफिस कंपनी रजिस्ट्रार यांचे अभिलेख तसेच इंटरनेटच्या माध्यमातून व्यापाऱ्याच्या उपलब्धतेविषयी खातरजमा करण्यात येत आहे. व्यापाऱ्याच्या मालमत्तेबद्दलची माहिती तहसिलदार वा तलाठी कार्यालय, नगरपालिका व महानगरपालिका यांच्या अभिलेखावरुन करण्यात येत आहे.

(४) लागू नाही.

-----------------

## कल्याण-डोबिंवली क्षेत्रातील २७ गावांतील शाळा जिल्हा परिषदेच्या हद्दीतून महानगरपालिकेमध्ये हस्तांतरण करण्याबाबत

**(७१) * ३६०३७ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोबिंवली महानगरपालिका क्षेत्रातील २७ गावांतील शाळा जिल्हा परिषदेच्या हद्दीतून महानगरपालिकेमध्ये हस्तांतरण करण्याचा निर्णय झाला असूनही प्रक्रिया पूर्ण झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही निर्णय न झाल्याने विद्यार्थी संबंधित सुविधांपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त २७ गावांतील शाळा जिल्हा परिषदेच्या हद्दीतून महानगरपालिकेमध्ये हस्तांतरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) उक्त २७ गावांतील शाळा जिल्हा परिषदेच्या हद्दीतून महानगरपालिकेमध्ये हस्तांतरण करण्याबाबत अधिसूचना निर्गमित करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोरेवाडी (ता.कर्जत) येथे कुपोषणामुळे एका बालिकेचा मृत्यू झाल्याबाबत

**(७२) * ३६१२४ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत तालुक्यातील मोरेवाडी येथील सोनाली पादीर या दीड वर्षीय मुलीचा पोषण आहार वेळेवर न मिळाल्याने कुपोषणाने मृत्यू झाल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंगणवाडी सेविकांच्या संप काळात १५० हून अधिक बालकांचा पोषण आहाराअभावी मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) नाही.

कर्जत तालुक्यातील मोरेवाडी येथील सोनाली पादीर ही दीड वर्षीय बालिका ही कमी वजन श्रेणीमधील असल्याचे आढळून आले होते. परंतु वैद्यकीय तपासणीनुसार सदर बालिका ही तीव्र कुपोषित श्रेणीमधील नव्हती. सदर बालिकेचा मृत्यू हा तिची नैसर्गिक विसर्जन क्रिया (मलमूत्र) बंद झाल्यामुळे झाला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात जलसंधारण प्रकल्पांच्या कामांमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत

**(७३) * ३६०५२ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलसंधारणांतर्गत अनेक प्रकल्प अपूर्णावस्थेत असून त्यांची मूळ अंदाजित किंमत काही लाखो रुपये असताना सदर प्रकल्प कोटयवधी रुपयांच्या सुधारित मान्यतेसाठी सादर केले असून त्यात मोठया प्रमाणात अनियमितता झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान जलसंधारण महामंडळाच्या ५३ व्या बैठकीत मा.जलसंधारण मंत्री व मा.जलसंधारण राज्यमंत्री यांच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या दिनांक ४ ऑक्टोंबर, २०१७ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या ५३ व्या बैठकीत कोकण प्रदेशातील ५ योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याचे प्रस्ताव निर्णयास्तव ठेवण्यात आले होते. यामध्ये मोठ्या प्रमाणात खर्चात वाढ दिसून आल्यामुळे सदर वाढीच्या कारणाबाबत पुनश्च तपासणी करून त्यास सक्षम स्तरावर मान्यता घेऊन प्रस्ताव फेरसादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले आहेत.

सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्तावित योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे अद्याप निदर्शनास आले नाही.

(२) सद्य:स्थितीत सदर वाढीच्या कारणांबाबत क्षेत्रियस्तरावर पुनश्च तपासणीची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे मुंढेवाडी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील भीमा नदीवरील बंधारा व पुलाच्या दुरुस्तीबाबत

**(७४) * ३५६१७ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मुंढेवाडी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील भीमा नदीवरील कोल्हापूर पध्दतीचा बंधारा व त्यावरील कठडा दुरुस्ती करणेसाठी लोकप्रतिनिधींनी मागणी केली असून सदर बंधाऱ्याच्या कठड्याचे व पुलाचे काम पूर्ण करण्यात येईल असे आश्वासन क्षेत्रिय अधिकारी यांनी शासनास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्याला कठडा नसणे व पुलाच्या दोन्ही बाजू खचल्यामुळे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान एक स्त्री व एक पुरुष वाहून गेल्याने त्यांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बंधारा दुरुस्त करण्याबाबत व बंधारा दुरुस्ती न करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) लोकप्रतिनिधींनी दुरूस्तीची मागणी केली होती. परंतु बंधाऱ्याच्या कठड्याचे काम करण्यात येईल, असे आश्वासन दिलेले नाही. को.प.बंधाऱ्यांना कठडे बांधल्यास पुराचे वेळी प्रवाहास अडथळा येत असल्यामुळे बंधाऱ्यांना कठडयाऐवजी संरक्षक दगड (Guard Stones) बसविण्यात येतात.

(२) हे खरे नाही. बंधाऱ्याच्या दुरावस्थेमुळे सदर दुर्घटना घडलेली नाही. दिनांक १४/०९/२०१७ रोजी सायंकाळी बंधाऱ्यावरील संरक्षक दगडावरून (Guard Stones) पाणी वाहत असताना एक पुरूष व स्त्री यांनी दुचाकीवरून बंधारा ओलांडण्याचा प्रयत्न करत होते. त्यावेळी उपस्थित ग्रामस्थानी त्यांना बंधाऱ्यावरून न जाणेबद्दल विनंती करूनही त्यांचे न ऐकता आम्हाला तातडीचे काम आहे असे सांगुन त्यांनी बंधाऱ्यावरून जाण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी बंधाऱ्यावरून पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने ते वाहून गेले.

(३) बंधाऱ्याच्या दुरावस्थेमुळे दुर्घटना घडलेली नसल्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही. तसेच भीमा पाटबंधारे विभाग यांचे दिनांक ०८/०९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये महसूल, पोलीस, नगरपालिका व पंचायत समिती या सर्व यंत्रणांना वाहतूक तातडीने बंद ठेवणेबाबत कळविले होते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयातील अंगणवाडीच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(७५) * ३५३९७ श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील १२०४ गावांत ३३५६ अंगणवाडया कार्यरत असून त्या अंगणवाडयांमध्ये ० ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना पुरक पोषण आहार देऊन कुपोषण रोखणे तसेच गर्भवती माता व किशोरवयीन मुलींना आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) तसेच जिल्हयातील ३३५६ अंगणवाडयापैकी २४२५ अंगणवाडयांना स्वत:च्या इमारती असून ८०० अंगणवाडया या भाड्याच्या जागेत सुरु असून तेथे त्यांना शौचालय, स्वतंत्र स्वयंपाक घर, आरोग्य इ. सोयी सुविधा उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ८०० अंगणवाडयाच्या बांधकामासाठी रुपये ४८ कोटी निधीचा प्रस्ताव आयुक्त एकात्मिक बालविकास यांचेकडे पाठविण्यात आला असून त्यावर अद्याप कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अंगणवाडयांना आवश्यक त्या सोई-सुविधा व बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) औरंगाबाद जिल्हयात एकूण ३५०६ अंगणवाडी केंद्र मंजूर आहेत. ३५०६ अंगणवाडयामध्ये ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना पुरक पोषण आहार देऊन कुपोषण रोखण्याचा तसेच गर्भवती माता व किशोरवयीन मुलींना आरोग्य विषयक मार्गदर्शन मिळण्याच्यादृष्टीने अंगणवाडया कार्यरत आहेत.

(२) औरंगाबाद जिल्हयातील ३५०६ अंगणवाडयांपैकी २४५२ अंगणवाडयांना स्वत:च्या इमारती असून २५० अंगणवाडया या भाडयाच्या जागेवर चालवल्या जात असून उर्वरित अंगणवाडी केंद्र शेजारची अंगणवाडी, शाळा खोली,

समाजमंदिर, ग्रामपंचायत, इत्यादी ठिकाणी भरविण्यात येतात त्या ठिकाणी शौचालय व आरोग्य सुविधा इत्यादी सुविधा पुरविल्या जातात.
(३) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांचेकडे निर्विवाद जागा उपलब्ध असलेल्या २५० अंगणवाडी इमारत बांधकामासाठी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत नवीन अंगणवाडी केंद्र इमारत बांधकाम घेण्यासाठी सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) जिल्हा नियोजन व विकास परिषद अंतर्गत प्राप्त होणाऱ्या तरतूदीमधून अंगणवाडी केंद्र इमारत दुरुस्तीचे कामे घेण्याबाबतची प्रावधान करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे नवीन अंगणवाडी केंद्राची इमारत बांधकामासाठी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ज्या ठिकाणी अंगणवाडी इमारतीकरिता जागा उपलब्ध आहे, त्या ठिकाणी या योजनेंतर्गत नवीन बांधकामे घेण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बावनथडी (ता.तुमसर, जि.भंडारा) प्रकल्पाच्या पुनर्वसनाबाबत

**(७६) * ३५९०६ श्री.परिणय फुके : दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक २१७२० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बावनथडी (ता.तुमसर, जि.भंडारा) प्रकल्पामुळे बेघर झालेल्या आदिवासीबहूल कमकासूर गावाचे रामपूर येथे पुनर्वसन करण्यात आले असून मागील पाच वर्षापासून पुनर्वसनस्थळी कोणत्याही नागरी सूविधा पुरविण्यात न आल्यामुळे नागरिक पुनर्वसित गाव सोडून कमकासूर या स्वगावी परत आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच मुलभूत नागरी सूविधा पुरविल्या नाही तर आदिवासी बांधव जलसमाधी घेणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक नागरीकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तसेच संबधितांकडे अनेक वेळा तक्रार करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) व (२) बावनथडी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील आदिवासीबहुल कमकासुर या गावातील प्रकल्पग्रस्त ५१ कुटंबाचे पुनर्वसन तुमसर तालुक्यातील रामपुर (हमेशा) या नविन गावठाणात १८ नागरी सोयीसह सन २०१२ मध्ये पुनर्वसन होऊन प्रकल्पग्रस्तांचे स्थलांतर झाले आहे व दिनांक ०५/०२/२०१३ ला पुनर्वसित गावठाण मौजा रामपूर जि. प. भंडारा यांना हस्तांतरित करण्यात आले. तथापि काही प्रकल्पग्रस्त काही कारणस्तव मुळ स्वगावी परत आले होते. प्रशासनाच्या विनंतीला मान देऊन प्रकल्पग्रस्त पूर्नवसीत गावठाणात परतले आहेत.

पुनर्वसनाची आवश्यक कामे यापुर्वीच पूर्ण झालेली आहेत त्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ब्रम्हपूरी वडाळा (जि.वर्धा) शिवारात नरभक्षक वाघिणीने हल्ला केल्याबाबत

**(७७) * ३५३०९ श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ब्रम्हपूरी वडाळा (जि.वर्धा) शिवारात नरभक्षक वाघिणीने हल्ला केल्यामुळे भिवाजी हरले वय ५६ वर्षे या शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याचे दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मृत शेतकऱ्याच्या वारसांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली व सदर नरभक्षक वाघिणीचा बंदोबस्त केला वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) वर्धा जिल्हयातील आष्टी वनपरिक्षेत्रातील मौजा भडकुभ येथे दिनांक १९/०९/२०१७ रोजी श्री.भिवाजी हरले, रा.वडाळा यांचा वाघिणीच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे, हे खरे आहे.
(२) व (३) प्रचलीत शासन निर्णयातील तरतूदीनुसार वन्यप्राण्याच्या हल्ल्यात मृत पावलेल्या श्री.भिवाजी हरले यांचे कायदेशीर वारस श्रीमती शांताबाई हरले (पत्नी) यांना रुपये ८.०० लक्ष आर्थिक मदत धनादेशाद्वारे अदा करण्यात आली आहे.

वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील कलम ११ (१)(अ) अंतर्गत मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांनी सदर नरभक्षक वाघिणीला ठार मारण्याचे आदेश दिले. त्या अनुषंगाने सदर वाघिणीला पारध करण्याचे सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आले. तथापि सदर वाघिणीचा दिनांक १४/१०/२०१७ रोजी कारंजा वनपरिक्षत्रातील अंभोरा येथील एका शेतात लावलेल्या विद्युत तारेच्या स्पर्शाने मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे.

-----------------

## ठाणे, पालघर, रायगड आणि नाशिक जिल्हयातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत

**(७८) * ३५३३७ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे, पालघर, रायगड आणि नाशिक या आदिवासी जिल्हयांमध्ये रोजगार हमी योजना कंत्राटी कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडवून रोजगार हमी योजनेबाबत सर्वंकष धोरण राबवून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत श्रमजीवी कामगार रयत संघटनाचे संस्थापक तथा माजी लोकप्रतिनिधी यांनी

मा.मुख्यमंत्री, मा.रोजगार हमी मंत्री व सचिव, रोजगार हमी विभाग यांच्याकडे दिनांक १७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनातील मागण्यांचे स्वरूप काय आहे, त्यानुसार सन २०१५ च्या शासन निर्णयानुसार झालेली वेतन वाढ व त्याचा फरक अद्याप या कर्मचाऱ्यांना मिळालेला नसल्याने शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करून कारवाई करणे व कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) होय.

(२) व (३) कंत्राटी कर्मचारी यांना कायम करणे, मानधनात वाढ करुन देणे, ग्राम रोजगार सेवकांना रोजगार निर्मितीच्या प्रमाणात प्रोत्साहन भत्ता देणे, मानधन वेळच्या वेळी देणे, जिल्हयातील ग्राम रोजगार सेवकांची पदे तातडीने भरावीत यासारख्या मागण्या केला आहेत. विभागाच्या दिनांक १७/११/२०१५ च्या परिपत्रकानुसार सेतू अथवा तत्सम मनुष्यबळ पुरवठादार संस्थेतर्फे नियुक्त करण्यात आलेल्या तांत्रिक अधिकारी, एमआयएस कोऑर्डिनेटर व क्लर्क कम डेटा एन्ट्री ऑपरेटर या पदावरील ज्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचा नियुक्तीचा ११ महिन्याचा कालावधी पूर्ण झाला आहे त्यांना मानधन वाढ देण्यात आली आहे. तसेच आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र, नागपूर यांच्या दिनांक ०८/०८/२०१७ अन्वये राज्यात कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेमध्ये १ वर्ष कालावधी पूर्ण झाला आहे, अशा कर्मचाऱ्यांना दिनांक ०१/०९/२०१६ पासून ८% मानधन वाढ लागू करण्यात आली आहे.

-----------------

## वैद्यकिय महाविद्यालयातून अभ्यासक्रम पुर्ण करणाऱ्या उमेदवारांना बंदपत्रित सेवेसंदर्भातील जाचक अटीस स्थगिती देणेबाबत

**(७९) * ३५४१३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकिय महाविद्यालयातून अभ्यासक्रम पुर्ण करणाऱ्या उमेदवारांना बंदपत्रित सेवेबाबतचा आदेश उपसचिव, वैद्यकिय शिक्षण विभाग यांनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अचानकपणे काढलेल्या या आदेशामुळे व निर्णयामुळे विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याने त्यास सन २०१८-१९ या वर्षातून वगळून स्थगिती देण्यात यावी अशी मागणी मा.मुख्यंमत्री महोदयांकडे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान पत्राव्दारे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आदेशास स्थगिती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे. दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ रोजी शासकीय/ महापालिकेच्या वैद्यकीय/दंत महाविद्यालयातून पदवी, पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी व अतिविशेषोपचार अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना बंधपत्रित सेवेसंदर्भात सुधारित अटी लागू करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) बंधपत्रित सेवा केल्याशिवाय उच्च शिक्षणास प्रवेशासाठी पात्र न ठरविण्याची तरतूद ही शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ऐवजी शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या प्रवेशापासून लागू करण्याबाबत शासन शुध्दीपत्रक दिनांक २४/११/२०१७ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोधडी, हळदा व हिमायतनगर (जि.नांदेड) येथील आरोग्य केंद्रातील असुविधेबाबत

**(८०) * ३५५८२ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोधडी (ता.किनवट, जि.नांदेड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात व हिमायतनगर (जि.नांदेड) शहरासह ग्रामीण भागातील रुग्णांना उपचार मिळावा म्हणून सुरु करण्यात आलेल्या ग्रामीण रूग्णालयात आवश्यक सलाईनसह अनेक औषधांचा तुटवडा असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच हळदा (ता.भोकर, जि.नांदेड) व बोधडी (ता.किनवट, जि.नांदेड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य कर्मचारी सतत गैरहजर राहत असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हळदा येथील आरोग्य केंद्र एक वर्षापासून बंद असून सदर केंद्र सुरु करण्यासाठी येथील ग्रामस्थांनी संबधित अधिकाऱ्यांना वारंवार निवेदने देऊनही दखल घेण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बंद असलेली आरोग्य केंद्रे सुरु करून केंद्रांना आवश्यक औषध पुरवठा पुरविण्याबाबत, केंद्राला आवश्यक कर्मचारी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच गैरहजर असणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र बोधडी तसेच ग्रामीण रुग्णालय हिमायतनगर येथे सप्टेंबर, २०१७ मध्ये व त्यानंतर आवश्यक औषधी साहित्य उपलब्ध आहे.

(२) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र सुरु असून ग्रामस्थांना नियमित सेवा देण्यात येते.

(३) हे खरे नाही.

उपकेंद्र हळदा प्राथमिक आरोग्य केंद्र मोघाळी अंतर्गत ता.भोकर, जि.नांदेड येथे कार्यरत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वर्धा येथील सेवाग्राम रुग्णालयात रुग्णालयाचे देयक अदा न केल्याने प्रसुती झालेल्या महिलेला उपाशी ठेवल्याबाबत

**(८१) * ३६७३३ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, अॅड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा येथील सेवाग्राम रुग्णालयात प्रसूती झाल्यानंतर पैशाचा भरणा न केल्याने रुग्ण महिलेला तीन दिवसांपासून जेवण न दिल्याचे दिनांक १० सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महिलेस बाळाला रुग्णालयात सोडून लोकांकडे मदतीची याचना करावी लागली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रुग्ण महिलेचे देयक माफ करणे तसेच दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) जिल्हा आरोग्य अधिकारी, वर्धा यांचेमार्फत केलेल्या चौकशीत सदर प्रकरणी तथ्य आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हा रुग्णालयात झालेल्या बालमृत्यू संदर्भातील अहवालाबाबत

**(८२) * ३५५०० श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा रुग्णालयात झालेल्या ५५ बालमृत्यू संदर्भात नाशिकच्या आयुक्तांनी आपला अहवाल मुख्य सचिव, सचिव, महिला व बालविकास विभाग तसेच सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना सादर केला असल्याचे माहे आक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालात प्रशासनाने कागदोपत्री नोंदी ठेवल्या आहेत, मात्र गरोदर मातांना पुरेसे अन्नच मिळाले नसल्याने त्यांचे बीएमआय (बॉडी मास इंडेक्स) १९ पेक्षा कमी असल्याचे व ते वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केला नसल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालाच्या निष्कर्षानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) बऱ्याचशा मातांचा बीएमआय कमी असल्याबद्दल या अहवालामध्ये नमूद केले आहे. बीएमआय हा मातेचे वजन व उंची या दोन्हीच्या आधारावर निश्चित केला जातो. वजन, उंची दोन्हीही मातेला तिच्या गर्भावस्थेपुर्वी पासूनच मिळालेला आहार, विविध सेवा यावर अवलंबून आहे. बीएमआय कमी असणे यासाठी वैदयकिय तसेच सामाजिक कारणेसुध्दा कारणीभूत आहेत.

जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या Interventions During Pregnancy for Reducing Neonatal Mortality नुसार जोखमिच्या निर्देशांकाची तपासणी करण्यात येणार आहे व त्यानुसार मातेचा बीएमआय मोजण्यात येणार आहे.

(३) विभागीय आयुक्त नाशिक यांनी नेमलेल्या समितीने दिलेल्या शिफारशीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्ह्यात वन्यप्राण्यांनी शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान केल्याबाबत

**(८३) * ३५६०४ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला तालुका तसेच जिल्हयात मोठया प्रमाणात हरिण, रानडुक्कर, रोही, माकड इत्यादी वन्यप्राणी वने सोडून मानवी वस्त्यांमध्ये घुसून हैदोस घालत असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे, खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त वन्यप्राण्यांनी घातलेल्या हैदोसामुळे जिल्हयातील/ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याने सदर शेतकऱ्यांनी दिनांक ६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.वने मंत्री यांच्याकडे नुकसान भरपाईच्या मागण्यांचे निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

वन्यप्राण्यांमुळे होत असलेल्या शेतपिकांच्या नुकसानाबाबत या विषयी विविध मागण्यांचे निवेदन एका राजकीय पक्षाचे कार्यकर्ते यांनी दिनांक ०६/१०/२०१७ रोजी मा.मंत्री (वने) यांना सादर केले आहे.
(३) व (४) हरिण, रानडुक्कर, रोही, माकड व इतर वन्यप्राण्यांकडून शेतपिकांचे नुकसान झाल्याचे अकोला जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये

१०८ प्रकरणे प्राप्त झाली असून प्रस्तुत प्रकरणी प्रचलित शासन निर्णयान्वये संबंधित शेतकऱ्यांना रुपये ३,२४,३२९/- इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

-----------------

## नेरळ (जि.रायगड) कुंभारआळी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(८४) * ३५६९८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेरळ (जि.रायगड) कुंभारआळी येथील जिल्हापरिषदेच्या प्राथमिक शाळेच्या इमारतीची दुरवस्था झाली असून विद्यार्थ्यांच्या जिवाला धोका निर्माण झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शाळेची तसेच राज्यातील सर्वच धोकादायक शाळांच्या इमारतींची पाहणी करुन इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्नांकीत शाळेची जुनी इमारत पाडण्यात आली असून, सर्व शिक्षा अभियान अंतर्गत बांधलेल्या ८ वर्ग खोल्यांमध्ये विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

**मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.**
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.